म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा. वा.
दा. क्र. 2006

BVBK-0-42008

# रामसखा सुग्रीव

BVBK-0402008

लेखक

डॉ. म. वि. गोखले

एम्. ए., पीएच्.डी.

म. सं. मं. कार्य, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. २००८ दिनांक २५/१/
विषय कथा क्र. ........

निर्मल प्रकाशन

प्रकाशन क्र. १२

प्रकाशक :
नरेंद्र अरगडे
निर्मल प्रकाशन
'देणगी'
१२ अमृतेश्वर सहकारी
गृहरचना मर्यादित, पुणे ९

□

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

□

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९८०

□

मूल्य : पाच रुपये

□

मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ,
पुणे ३०.

□

प्राप्तिस्थान
अरगडे आणि मंडळी
आप्पा बळवंत चौक
पुणे ३०.

# भूमिका

एखादा वक्ता आपल्या समोरच्या अपरिचित श्रोत्यांची मनं जिंकून घेण्यासाठी 'मित्रहो' अशी हाक देऊन आपलं भाषण सुरू करतो; आपल्यालासुद्धा कधी एखाद्या अपरिचित व्यक्तीशी प्रथमच बोलायची वेळ आली तर आपणही 'मित्रा' या शब्दानं संवादाचा आरंभ करतो; या पद्धती सगळ्यांच्या चांगल्याच परिचयाच्या आहेत. आपण सर्वाधिक भरंवसा बाळगू शकतो तो आपल्या 'मित्राचाच' आणि आपल्या संकटात मदतीला येईलच अशी व्यक्ती म्हणजे आपला 'मित्रच'!

एखाद्यानं, 'आपल्याला कोणी आप्त नाहीत' असं म्हटलं तर आपल्याला जेवढं आश्चर्य वाटेल, त्याच्या शतपटीनं आश्चर्य एखाद्यानं 'मला मित्र नाहीत,' असं म्हटलं तर आपल्याला वाटेल. कारण, माणसानं आपल्या चांगुलपणानं, स्वतःच्या वागण्यातील गोडव्यानं मित्र मिळवायचे असतात. 'तो माझा मित्र आहे' हे सांगतानाच आपण अप्रत्यक्षपणे 'मी त्याचा मित्र आहे' ही भावनाही सूचित करतो. कारण दोन माणसं एकमेकांची मित्र असतात असाच त्यातला खरा खर्थ आहे, तोच मित्र-कल्पनेतील योग्य भाव आहे. ज्याला मित्र म्हटला त्यानं आपल्याला मदत करावी अशी अपेक्षा म्हणजे उलटपक्षी आपणही त्याला मदत करायला सिद्ध आहोत याची निश्चिती असते. सर्वसाधारण व्यवहारात अशी दोन माणसं की जी एकमेकांना अडचणीच्या काळात मित्रकर्तव्य जाणून मदत करतात, त्यांचाच 'मित्र' किंवा 'सखा' म्हणून उल्लेख होत असतो.

श्रीरामांच्या जीवनचरित्रात त्यांच्यावर आलेल्या विविध संकटांपैकी सर्वात अधिक दुःखदायक संकट म्हणजे श्रीरामाच्या पत्नीची–सीतेची ताटातूट! या महान् संकटाच्या वेळी श्रीराम अगतिकपणे सीतेचा शोध घेत निघाले. जटायूने या प्रसंगात प्राणत्याग करून मित्रभावाने श्रीरामांना मदत केली; कबंध नावाच्या राक्षसरूपी शापित गंधर्वानेही मरता मरता श्रीरामांच्या कार्याला दिशा दाखविली; शबरीने भक्तिभावाने श्रीरामांना प्रसन्न करून, त्यांना ऋष्यमूक पर्वताच्या दिशेने पाठवून आपले कर्तव्य पार पाडले. ऋष्यमूकावर श्रीरामांची वानरराज सुग्रीवाशी गाठ पडली.

श्रीराम सीताहरणाच्या संकटाने ग्रासलेले होते आणि सुग्रीव हा त्याचा बंधू वाली याच्या आडदांडपणाने देशोधडीला लागला होता. संकटात सापडलेल्यांची मैत्री लवकर होते म्हणतात, तसेच येथे घडले. श्रीराम आणि सुग्रीव ह्यांनी अग्नीच्या साक्षीने मैत्रीचे बंधन स्वीकारले आणि त्यांनी एकमेकांसाठी कष्ट सोसून आपला मित्रभाव सिद्ध केला. सुग्रीवासाठी श्रीरामांनी वालीहत्येचे दूषण पत्करले; तर सीतेच्या शोधासाठी आणि तिच्या सुटकेसाठी सुग्रीवाने स्वतः आपल्या सर्व सामर्थ्यासह श्रीरामांना मदत केली; यालाच म्हणायची खरी मित्रभावना!

'रामसखा सुग्रीव'ची ही चरित्रकथा तुम्हाला खात्रीनं आवडेल!

१९/२७७, लोकमान्यनगर,
पुणे ३०.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २०००८ दिनांक २५।९।९८
विषय बा. वा.

१

मेरू नावाचा एक खूप मोठा आणि पवित्र पर्वत होता. त्या पर्वतावरचा भाग सोनेरी रंगानं माखलेला होता. अशा त्या चकचकीत पर्वताचं मधलं आणि उंचच उंच असं जे शिखर होतं, ते देवांनाही फार प्रिय होतं. कारण, तिथं मोकळी हवा आणि निर्मळ पाणी, तसंच विशेष शांत असा एकान्त त्यांना अनुभवायला मिळत होता.

मेरू पर्वताच्या त्या गगनचुंबी शिखरावर ब्रह्मदेवानं तर स्वतःसाठी एक भव्य सभाच निर्माण केली होती. शंभर योजने विस्तीर्ण आणि तितकीच रमणीय असलेली ती ब्रह्मदेवाची सभा निमित्तापुरती सभा असली, तरी खरं म्हणजे ती त्या चतुर्मुख ब्रह्मदेवाची ध्यानधारणेची आवडती जागा होती. श्रीविष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेला ब्रह्मदेव मेरू पर्वतावरच्या त्या ठिकाणी पुष्कळ वेळा ध्यानधारणेसाठी बसत असे.

एकदा असाच ब्रह्मदेव ध्यानस्थ बसला असताना त्याच्या डोळ्यांतून एकाएकी पाणी आले. त्या पाण्याचे थेंब स्वतःच्या हातात पकडून

ब्रह्मदेवाने ते हातातल्या हातात चोळले. यावेळी ब्रह्मदेवाच्या हातातून काही जलकण भूमीवर पडले. जगाची निर्मिती करणारा तो ब्रह्मदेव यावेळी तोंडाने मंत्रोच्चार करत होता आणि हाताने पाण्याच्या रूपातील अश्रू चोळत होता. एकाएकी ब्रह्मदेवाला समजले की भूमीवर पडलेल्या जलकणांमधून एक आकृती अस्पष्टपणे आकाराला येत आहे. तेव्हा ब्रह्मदेवाने अधिक लक्षपूर्वक तिकडे पाहिले आणि काय आश्चर्य, त्या जलकणांमधून एक वानराची आकृती निर्माण होत होती. तो वानर पूर्णपणे निर्माण झाल्यावर ब्रह्मदेवालाही कौतुक आणि आनंद वाटला. त्याने अत्यंत प्रेमळ दृष्टीने त्या वानराकडे पाहून म्हटले,

'बाळा, मी ब्रह्मदेव आहे. घाबरू नको, स्थिर हो. माझ्याच कृपेने तुझी निर्मिती झाली आहे. आता माझ्याच अनुज्ञेने तू येथे या पर्वतावर राहा. हा विस्तीर्ण पर्वत देवादिकांनाही प्रिय आहे. ते देवादिक नेहमीच या पर्वताचा आश्रय करतात. ह्या रमणीय पर्वतावर अनेक प्रकारची फळें आणि मुळें विपुल आहेत. हे वानरश्रेष्ठा, तू नित्य माझ्या-जवळ इथेच राहात जा. निदान काही काळपर्यंत तरी तू येथे राहा. या पर्वताच्या विस्तीर्ण पृष्ठावर, जलाशयांमध्ये आणि वनराईमध्ये तू निःशंकपणे विहार करत जा. माझ्याकडूनच तुझी निर्मिती झाली आहे. तुझे कल्याण होईल.'

याप्रमाणे ब्रह्मदेवाने सांगितल्यावर तो नवजात वानरश्रेष्ठ अत्यंत आनंदित झाला. त्याने भीत भीत एक एक पाऊल पुढे टाकत ब्रह्मदेवाच्या जवळ जाऊन ब्रह्मदेवाच्या आश्वासनाविषयी खात्री करून घेतली. नंतर त्याने अत्यंत आदराने आणि नम्रतापूर्वक ब्रह्मदेवाच्या पायाला स्पर्श करून वंदन केले. पुन्हा एकदा ब्रह्मदेवाकडे पाहून मग आपले डोके ब्रह्मदेवाच्या पायांवर टेकवले आणि आपल्या मनातली कृतज्ञता व्यक्त केली. एवढे झाल्यावर तो वानरश्रेष्ठ ब्रह्मदेवाला म्हणाला,

'अहो देवा, आपण कृपावंत होऊन जे जे सांगाल त्याप्रमाणे करायला मी सिद्ध आहे. आपले आशीर्वाद असल्याने मी निर्भय आहे.' असे बोलल्यावर ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन तो वानरश्रेष्ठ सभास्थानातून बाहेर पडला आणि त्या मेरू पर्वतावर सर्वत्र मोकळेपणाने संचार करू लागला.

मेरू पर्वतावर जेथे फळामुळांची समृद्धी असलेली वने होती, अशा त्या वनस्थानातून तो वानरश्रेष्ठ मनसोक्त विहार करत होता, जलाशयांमध्ये हवे तेवढे डुंबत होता. उत्कृष्ट आणि मधुर फळे भक्षण करत होता. दिवसभर अशाप्रकारे त्या पर्वताच्या पृष्ठभागावरील सर्व प्रकारच्या सुखसोयींचा मनमुराद आनंद लुटल्यावर तो वानरश्रेष्ठ सायंकाळी परत ब्रह्मदेवाकडे येत असे. हा त्याचा जीवनक्रम अनेक दिवस असाच चालू होता.

अशा प्रकारे तो वानरश्रेष्ठ बराच काळ मेरू पर्वतावर राहिला. काही काळाने त्याला ब्रह्मदेवाकडून ऋक्षराज वानरश्रेष्ठ अशा नावाने संबोधले जाऊ लागले. एके दिवशी हा वानरश्रेष्ठ त्या मेरू पर्वताच्या उत्तरशिखरावर विहार करत असताना त्याला खूप तहान लागली. तो पाण्याचा शोध घेत एका सरोवरापाशी येऊन पोहोचला. तो त्या सरोवराच्या काठावर असताना त्या निर्मल सरोवराच्या पाण्यात त्याला आपले प्रतिबिंब दिसले. आता तो वानरश्रेष्ठ बराच प्रौढ आणि उग्र दिसू लागला होता. पाण्यातले आपले प्रतिबिंब पाहून स्वतःला न ओळखता त्याने पाण्यात तो कोणी आपला शत्रूच आहे अशी समजूत करून घेतली. 'हा माझा शत्रू माझ्याकडे टक लावून पाहात असून, तो मला हिणवतो आहे ! आता ह्याला एकदा चांगला धडा शिकवतो !' असे स्वतःशीच म्हणत त्या वानरश्रेष्ठाने आपल्या शत्रूच्या अंगावर उडी टाकण्याच्या कल्पनेने सरोवरात उडी मारली.

त्या सरोवरात वानरश्रेष्ठाने उडी मारताच त्याचे प्रतिबिंब नाहीसे झाले आणि त्यावर 'शत्रू भिऊन पळाला' अशी स्वतःची समजूत करून घेऊन तो वानरश्रेष्ठ पाण्यातून बाहेर पडून पुन्हा काठावर आला. आणि काय आश्चर्य !—

तो वानरश्रेष्ठ आता स्त्रीचे रूप घेऊन उभा होता. त्या स्त्रीचे रूप सुंदर होते. मस्तकावरचे काळे नि कुरळे केस; गौरवर्ण आणि नाजुक शरीर यांमुळे ती स्त्री आकर्षक दिसत होती. ती स्त्री हसतमुख होती आणि हसताना तिच्या गालाला गोड खळी पडत असे. त्या स्त्रीच्या सभोवार मंद तेज पसरलेले होते. अशी ती रूपसंपन्न, तरुण स्त्री त्या सरोवराच्या काठावर उभी राहून आजूबाजूचा प्रदेश न्याहाळत होती. याच वेळी तेथून देवराज इंद्र ब्रह्मदेवाचे दर्शन घेऊन परत आपल्या ठिकाणी चालला होता. तसाच सूर्यदेवही त्याच वेळी त्याच ठिकाणाहून चालला होता. ती सुंदर स्त्री जेथे उभी होती, त्या ठिकाणी ते दोघेही एकदमच येऊन पोहोचले. दोघांनाही ती स्त्री आवडली. दोघांनाही ती आपल्याला मिळावी अशी इच्छा झाली.

देवांना कोणतीही इच्छा झाली की ते ती पूर्ण करून घेऊ शकतात. त्याप्रमाणेच यावेळीही घडले इंद्रापासून त्या स्त्रीला वाली या नावाचा आणि सूर्यापासून सुग्रीव या नावाचा असे दोन पुत्र झाले. त्या दोन पुत्रांना इंद्र आणि सूर्य अशा पित्याच्या ठिकाणी असलेल्या दोघा देवांनी अलौकिक अशा काही गोष्टी दिल्या. त्या दोन पुत्रांपैकी वालीला इंद्राने अक्षय्य आणि तेजस्वी अशी एक सोन्याची माला दिली. सूर्याने सुग्रीवाच्या कार्याविषयी आणि उद्योगाविषयी वायूपुत्राची योजना केली. नंतर ते दोघेही देव स्वर्गात निघून गेले.

दुसरा दिवस उजाडला तेव्हा स्त्रीरूप नाहीसे होऊन पुन्हा ऋक्षराज आपल्या मूळच्या वानररूपात आला. त्याने पाहिले तर ते दोन पुत्रही

आता वानररूप पावले होते. महाबलाढ्य आणि पिंगट डोळे असलेले ते दोन पुत्र वानरश्रेष्ठाला खूप आवडले. त्याने त्या दोन वानरपुत्रांना अमृततुल्य फळांचा रस पाजला आणि मग त्या दोघांना घेऊन तो वानरश्रेष्ठ ब्रह्मदेवाकडे आला. आदल्या रात्री वानरश्रेष्ठ परत न आल्यामुळे सचिंत झालेल्या ब्रह्मदेवाने, वानरश्रेष्ठ दोन वानरपुत्रांसह परत येत असल्याचे पाहिले आणि तो खूप आनंदित झाला. नंतर ब्रह्मदेवाने वानरश्रेष्ठाकडून सर्व वृत्तान्त विचारून समजावून घेतला. मग काही वेळ विचार केल्यावर त्याने वानरश्रेष्ठाला सांत्वनपर उपदेश केला.

ब्रह्मदेवाने त्यानंतर ह्या वानरश्रेष्ठाचे आणि त्याच्या दोन्ही पुत्रांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने काही योजना मनात निश्चित केली. ब्रह्मदेवाने एका देवदूताला बोलावून सांगितले, 'हे दूता, माझी आज्ञा म्हणून तू नीट ऐक. सर्वगुणसंपन्न, विशाल आणि शुभ अशा किष्किंधा-नामक नगरीला तू जा. विश्वकर्म्याने माझ्याच आज्ञेवरून ती नगरी आणि तिचा आसमंत ह्या यथेष्ट रूप धारण करणाऱ्या वानरांनी गजबजून गेलेला आहे. ती नगरी ह्या ऋक्षराज वानरश्रेष्ठाच्या वास्तव्याला योग्य अशीच आहे. तेव्हा तू ह्यांना घेऊन तेथे जा. अत्यंत सावधपणे आणि हुशारीने वागून तेथे तू सर्व वानरांना एकत्र कर. नंतर ह्या सर्वांचा सन्मानपूर्वक आदर करून, मग ह्या वानरश्रेष्ठाला एका उंच आणि मोठ्या आसनावर बसवून त्याला राज्याभिषेक कर. ह्या बुद्धिमान् वानरश्रेष्ठाचे दर्शन होताच तेथील वानर ह्याच्या अंकित होतील.'

ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणे देवदूत वानरश्रेष्ठ ऋक्षराज आणि त्याचे दोन वानरपुत्र वाली आणि सुग्रीव ह्यांना बरोबर घेऊन लगेच किष्किंधा-नगरीकडे गेला. त्या शुभ नगरीत पोचल्यावर त्या देवदूताने सर्व वानर एकत्र करून ऋक्षराज वानरश्रेष्ठाला राज्याभिषेक केला. या नंतर सर्व वानरांनी आपल्याला चांगला राजा मिळाला याविषयीची आपली

भावना मोठमोठ्याने ओरडून व्यक्त केली. अशा रीतीने तो ऋक्षराज वानराधिपती बनला. तोच ज्यांना माता-पिता अशा दोन्ही नावांनी प्रिय होता, असे वाली आणि सुग्रीव हेही त्या किष्किंधानगरीत आनंदात राहू लागले.

काही वर्षे सुखाने राज्य करणारा ऋक्षराज आपले दोन पुत्र वाली आणि सुग्रीव यांच्यावर खूप परिश्रम घेत होता. बल, शील आणि नेतृत्व अशा विविध गुणांनी ते पुत्र परिपूर्ण व्हावेत म्हणून त्याचा नेहमी प्रयत्न चाललेला असे. पुढे कालांतराने तो ऋक्षराज वानरश्रेष्ठ वृद्ध होऊन मरण पावला. त्यानंतर ज्येष्ठ पुत्राचा मान असलेला वाली मंत्र्यांच्या संमतीने राजपदावर आला. त्यावेळी सुग्रीवानेही आपल्या ज्येष्ठ बंधूचा हा सन्मान मनापासून मान्य केला.

वालीने आपल्या पराक्रमाने आणि हुषारीने सर्वत्र कीर्ती मिळविली. सुग्रीवालाही आपल्या बंधूचा अभिमान वाटत होता. त्यामुळे तोही बंधूवर प्रेम करत असे; त्याला योग्य तेवढा मान देत असे; त्याच्या आज्ञेत वागून नम्रपणे आपला आदर व्यक्त करत असे. वालीनेही किष्किंधेच्या प्रजेला समाधान होईल आणि शत्रूला धाक वाटेल अशा पद्धतीने राज्य चालविले.

# २

वाली किष्किंधेवर राज्य करत असताना, त्याच्याशी शत्रुत्व करणारा दुंदुभी राक्षसाचा पुत्र, मायावी नावाचा राक्षस, वालीला वारंवार त्रास देत असे. वालीला आव्हान देण्याची त्याला फार इच्छा होती. याच विचाराने एकदा तो महादैत्य मायावी किष्किंधेच्या वेशीपाशी आला. तो वालीने त्याच्याशी द्वंद्वयुद्ध करावे म्हणून गर्जना देऊ लागला. त्या राक्षसाच्या भयंकर गर्जना ऐकून झोपेत असलेले सारेजण जागे झाले. वालीला त्या गर्जनांमुळे जाग आल्यावर तो खूपच संतापला. वेगाने राजवाड्याबाहेर पडून त्या राक्षसाला मारून टाकणे एवढा एकच विचार त्यावेळी त्याच्या मनात होता. परंतु वालीच्या कुटुंबातील सर्वांनीच त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. अखेर जेव्हा वाली कोणाचेच ऐकेना तेव्हा सुग्रीवानेही त्याला रात्रीच्या वेळी ते धाडस न करण्याविषयी सांगून पाहिले, पण वाली बाहेर पडलाच.

वालीवर खरे प्रेम करणारा त्याचा बंधू सुग्रीवही तेव्हा त्याच्या पाठोपाठ राजवाड्याबाहेर पडला. महाबलाढ्य वाली वाड्याच्या बाहेर आलेला पाहताच मायावी नावाच्या त्या राक्षसाने युद्धाचा पवित्रा घेतला, पण त्याचवेळी सुग्रीवही वाड्याबाहेर पडलेला त्या राक्षसाने पाहिला. आता या दोन बलाढ्य आणि महापराक्रमी बंधूंच्या समोर आपला टिकाव लागणार नाही असे जाणून तो राक्षस जीव वाचवण्यासाठी पळत सुटला. आपला शत्रू भिऊन पळतो आहे हे

पाहून वाली आणि सुग्रीव ह्यांनाही त्वेष आला आणि तेही त्या राक्षसाला पकडण्यासाठी जोराने धावू लागले.

तो मायावी नावाचा राक्षस पुढे आणि वाली-सुग्रीव हे दोघे वानरश्रेष्ठ त्याच्या मागे, अशी ही शर्यत फार थोडा वेळ चालली. चंद्रप्रकाशाच्या साहाय्याने त्या दोघांनी राक्षसाला नेमका हेरला आणि त्याला गाठून ते त्याच्या जवळ जाऊन पोहोचले. पण तेवढयात तो राक्षस पाला-गवताने झाकलेल्या जवळच्या एका आडोशाकडे गेला आणि तेथेच असलेल्या एका गुहेत शिरला. परंतु त्याचा ह्या लपंडाव वालीच्या डोळ्यादेखत घडला आणि आधीच क्रोधाविष्ट झालेला वाली तिकडे धावला. सुग्रीवही पाठोपाठ होताच. त्या बिळाच्या तोंडाशी आल्यावर वाली सुग्रीवाला म्हणाला,

'सुग्रीवा, तू या गुहेच्या तोंडाशीच सावधपणे उभा राहा; म्हणजे पुन्हा तो राक्षस बाहेर पडलाच तर तुझ्या हाती सापडेल. मी मात्र आत जाऊन त्या दुष्टाचा वध करतो.' यावेळी सुग्रीवाने वालीला एकट्याने आत न जाता आपल्यालाही बरोबर नेण्याविषयी विनंती केली; पण वालीला ते मान्य झाले नाही. 'गुहेच्या दाराशीच उभा राहा' असे सुग्रीवाला शपथ घालून वालीने सांगितले आणि स्वतः वाली एकटाच त्या गुहेत गेला. सुग्रीव उत्कंठेने दाराशीच थांबला. यावर खूप काळ लोटला. दिवस-महिने-वर्षं लोटले. वाली अजूनही परत आला नव्हता.

आता सुग्रीवाच्या मनात नाही नाही त्या शंका येऊ लागल्या. 'वालीचे आत काही बरेवाईट तर झाले नसेल ना?' अशा शंकेने आणि वालीच्या मृत्यूच्या कल्पनेने सुग्रीव फारच दुःखी आणि भयभीत झाला. तरीही तो दारापाशी प्रामाणिकपणे उभाच होता. यावरही बराच काळ लोटला. एके दिवशी सुग्रीवाला काही राक्षस गर्जना करत

असल्याचा भास झाला. पण वालीचा शब्द काही कानावर आला नाही. शिवाय एक दिवस सुग्रीव ज्या बिळाच्या तोंडाशी उभा होता त्या बिळातून फेसाळ रक्ताचे पाट वाहू लागल्याचेही त्याच्या दृष्टीला पडले. तो सारा प्रकार पाहून आणि लोटलेला काळ लक्षात घेऊन सुग्रीवाच्या मनाची खात्री झाली की आपला प्रिय बंधू वाली निश्चित मरण पावला असावा. सुग्रीवाला खूप दुःख झाले.

यानंतर थोडा विचार करून सुग्रीवाने त्या गुहेच्या तोंडावर एक भली मोठी शिळा आणून बसवली. वालीचा वध करणारा तो दैत्य निदान आत कोंडून राहावा, असाही हेतू त्यावेळी सुग्रीवाच्या मनात होता. एवढे झाल्यावर मोठ्या कष्टाने आणि दुःखी मनाने सुग्रीव किष्किंधेला परतला. पण त्याला एकटाच परतलेला पाहून सुग्रीवाला वाली विषयी अनेक प्रश्न अनेकांनी विचारले. कोणाला काही, कोणाला काही सांगून सुग्रीवाने वालीविषयी म्हणजे त्याच्या मृत्यूविषयी स्पष्टपणे कोणालाच काही सांगितले नाही. परंतु जसजसा काळ लोटला तसतशी सर्वांची खात्री झाली की वाली मृत्यू पावला.

आता राज्यहिताचा विचार करणे आवश्यक होते, म्हणून किष्किंधेतील मंत्र्यांनी, आप्तांनी आणि नागरिकांनी एकत्र बसून विचार केला आणि सुग्रीवाला राज्याभिषेक करण्याचा त्यांनी एकमताने निर्णय घेतला. सुग्रीवालाही सर्वांच्या आग्रहामुळे आणि राज्यहिताच्या दृष्टीने तो निर्णय काहीशा दुःखी मनाने स्वीकारावाच लागला. सुग्रीवाने राज्याभिषेकानंतर अत्यंत न्यायाने राज्य केले आणि सर्व प्रजेचा प्रतिपाळ अत्यंत प्रेमाने केला. राज्य करत असतानाही सुग्रीवाला वारंवार वालीची आठवण येऊन दुःख होत असे. आपण आपल्या प्रिय आणि ज्येष्ठ बंधूच्या, किष्किंधेच्या खऱ्या राजाच्या अनुपस्थितीत केवळ प्रतिनिधीच्या नात्याने

हे राज्य करतो आहोत हीच नम्र भावना सुग्रीवाच्या मनात सदोदित कायम असे.

सुग्रीव राज्यपदावर आरूढ होऊन काही दिवस लोटल्यावर अकस्मात एके दिवशी वाली किष्किंधानगरीत उपस्थित झाला —

वाली जेव्हा सुग्रीवाला गुहेच्या दाराशी उभा करून आत गेला, तेव्हा त्याला त्या गुहेत खूप खोलवर जाऊनही मायावीचा शोध लागला नाही. परंतु त्या राक्षसाविषयी निर्माण झालेल्या रागामुळे वालीने कंटाळा न करता तो शोध तसाच चालू ठेवला. ती गुहाही अशी प्रचंड आणि रहस्यमय होती की हा शोध करता करता एक वर्ष सहज निघून गेले.

मग अचानक एक दिवस भीतिग्रस्त आणि दडून राहिलेला असा तो दैत्य वालीच्या नजरेस पडला. त्यावर वालीने त्याच्याशी युद्ध करून त्या राक्षसाचा त्याच्या बांधवांसह वध केला. त्यावेळी त्या राक्षसांच्या अंगांतून निघालेल्या रक्ताने ती संपूर्ण गुहा भरून गेली. वालीला बाहेर पडण्याचाही मार्ग दिसेना. तो कसाबसा बिळाच्या तोंडाशी आला, पण ते तोंड एका मोठ्या शिळेने बंद करण्यात आले होते. ' सुग्रीवा–सुग्रीवा ' अशा त्याने हाकाही मारल्या पण प्रत्युतर द्यायला सुग्रीव तेथे नव्हता. पुढे काही दिवस वालीने लाथाबुक्क्या मारून मारून त्या गुहेच्या तोंडावर बसविलेली शिळा फोडून काढण्यात यश मिळविले.

' आपल्याला त्या गुहेत कोंडून आणि राक्षसाच्या तावडीत देऊन राज्यलोभानेच सुग्रीवाने हे कृत्य केले ' असा त्यावेळी वालीचा निश्चय झाला. त्याला सुग्रीवाच्या नीचपणाचा राग आला आणि तशा रागावलेल्या मनानेच तो किष्किंधेकडे सुग्रीवाला धडा शिकवण्याच्या इच्छेने परतला —

वाली किष्किंधेला परत आला, तेव्हा सुग्रीव राजा बनला असल्याचे त्याला समजले आणि आपला संशय खराच आहे, याविषयी वालीच्या मनाची खात्री पटली. मग त्याचा राग अनावर झाला. तो ताडताड चालत एकदम राजवाड्यात आला आणि भर सभेत त्याने सुग्रीवावर लोभी, मत्सरी, दुष्ट, असत्य आचरण करणारा इत्यादि दूषणे देऊन आरोप केले. सुग्रीवाने खरी हकीगत, गैरसमजाची कारणे वगैरे स्पष्टीकरण सांगून वालीचा राग शांत करण्याचा प्रयत्न केला. तसेच आता वालीने पुन्हा राज्यपदाचा स्वीकार करावा अशी विनंतीही सुग्रीवाने वालीला केली. परंतु सुग्रीवासंबंधी वालीच्या मनात घर करून बसलेली भावना बदलली नाही.

सुग्रीवाने प्रार्थनापूर्वक आणि स्पष्ट शब्दात आपला निरपराधीपणा वारंवार सांगून पाहिला; परंतु वालीने त्याचे स्पष्टीकरण मान्य न करता उलट सर्व मंत्री आणि नागरिक यांच्यासमोर त्याची कठोर शब्दांत निंदाच केली आणि सुग्रीवाची किष्किंधेतून एका वस्त्रानिशी हकालपट्टी केली. एवढेच नव्हे तर सुग्रीवाच्या पत्नीचाही त्याने अपहार केला. सुग्रीव बिचारा काहीही न बोलता किष्किंधेतून बाहेर पडला. ठिकठिकाणची वने, पर्वत, समुद्रकाठ अशी भ्रमंती करत करत अखेर ऋष्यमूकपर्वताच्या आसमंतात येऊन पोहोचला.

# ३

ऋष्यमूक पर्वताच्या आसमंतात आल्यावर सुग्रीवाला एक आश्चर्यकारी वृत्तान्त समजला. त्या वृत्तान्तामधूनच सुग्रीवाच्या निवासाची व्यवस्था झाली आणि वालीच्या भयाने त्रस्त झालेल्या त्याच्या मनाला पुष्कळच धीर आला. कारण त्या प्रदेशात वाली येणे शक्य नव्हते; वालीला एका शापाचे भय होते आणि तो शाप त्याला त्या प्रदेशात येण्यास प्रतिबंध करणारा होता. त्या विषयीचा मूळ वृत्तान्त असा होता की —

कैलासपर्वताच्या शिखराप्रमाणे तेजस्वी आणि महिषरूप धारण केलेला असा एक दुंदुभी नावाचा दैत्य होता. सहस्र हत्तींचे बल त्या दैत्याच्या ठायी एकवटलेले होते. त्याला मिळालेल्या वरांमुळे तो दैत्य अत्यंत बलवान् आणि तेवढाच गर्विष्ठ बनला होता. पृथ्वीवर उन्मत्तपणे वागून त्याने नानाविध वीरांना निष्प्रभ केले होते. एकदा तो धिप्पाड दुंदुभी समुद्रकाठावर आला असताना प्रचंड आकाराच्या आणि गर्जना करणाऱ्या लाटा त्याच्या दृष्टीस पडल्या. त्या लाटांच्या निमित्ताने त्याला सागराच्या अफाट सामर्थ्याची जाणीव झाली. उगीचच त्याला सागराचे सामर्थ्य अजमावून पाहण्याची इच्छा झाली. तेव्हा त्याने सरळ त्या सागराला आव्हान दिले. दुंदुभीने सागराला म्हटले, ‘ सागरा, माझ्याशी युद्ध कर ! ’

दुंदुभीचे हे शब्द ऐकताच तो महासागर विचारात पडला. त्याला

हे जाणवले की या दैत्याचा काळ जवळ आला असावा, म्हणून हा दुर्बुद्धी धरून असले गर्वयुक्त विचार मनात आणतो आहे. त्या महासागराने त्यावर शांतपणे म्हटले, 'हे युद्धनिपुण वीरश्रेष्ठा, मी काही तुझ्यासारख्या बलवान वीराशी युद्ध करायला समर्थ नाही. परंतु तुझ्याशी युद्ध करायला कोण समर्थ आहे हे मी तुला सांगू शकतो, ऐक. महारण्यामध्ये तपस्वी जनांचे आश्रयस्थान बनलेला आणि शंकराचा श्वशुर असलेला एक महान पर्वतराज आहे. त्या पर्वताचे नाव हिमवान असे असून, तो पर्वतराज महाबलवान आहे. त्या पर्वतराजाचा पृष्ठभाग मोठमोठ्या जलप्रवाहांनी आणि अनेक भीषण गुहांनी युक्त आहे. तो पर्वतराज तुझ्याशी युद्ध करण्यास समर्थ असून, तुला सुद्धा त्याच्याशी युद्ध केल्याने सामाधान होईल.' हे त्या सागराचे भययुक्त भाषण ऐकल्यावर दुंदुभी दैत्य अधिकच गर्वयुक्त झाला आणि वेगाने हिमवान् पर्वताच्या दिशेने झेपावला.

हिमवान् पर्वताच्या आसपास असलेल्या अरण्यामध्ये तो दुंदुभी राक्षसश्रेष्ठ जाऊन पोहोचला. तेथे गेल्यावर त्याने पर्वतावरच्या मोठमोठ्या हत्तींएवढया पांढऱ्या रंगाच्या शिळा जमिनीवर आपटून फोडण्यास आरंभ केला. तेव्हा आपल्याच एका शिखरावर उभा राहून हिमवान् पर्वत राक्षसाला म्हणाला, 'हे दुंदुभीवीरा, मला त्रास देऊ नकोस. तपस्वी जनांना आश्रयस्थान असलेला मी, रणकर्मामध्ये प्रवीण नाही.' हे पर्वताचे भाषण ऐकून दुंदुभीने त्याला म्हटले, 'तू जर माझ्याशी युद्ध करायला समर्थ नाहीस, तर माझ्याशी युद्ध कोण करू शकेल ते सांग.' तेव्हा तो हिमवान् पर्वत सांगू लागला, 'हे महापराक्रमी दुंदुभी, वाली म्हणून एक महाप्रतापी वानर आहे. हा इंद्रपुत्र युद्धकर्मात निपुण असून बलाढयही आहे. तो किष्किंधानगरीत राहतो. तू त्याच्याकडे

जाऊन आव्हान दे.' हे हिमवान् पर्वताचे भाषण ऐकताच क्षणाचीही विश्रांती न घेता तो राक्षसश्रेष्ठ दुंदुभी किष्किधानगरीकडे निघाला.

किष्किंधेला येताच त्याने आपले महिषाचे रूप घेऊन नगराच्या वेशीला गर्जना देत धडका मारण्यास आरंभ केला. त्याने तेथील वृक्ष मोडण्याचा, खुरांनी जमीन उकरण्याचा आणि शिंगांनी वेशीचे दार उखडण्याचा सपाटा चालविला. ह्या त्या राक्षसाचा पराक्रम आणि आव्हान देणाऱ्या गर्जना वालीला समजल्यावर तोही क्रुद्ध झाला. तो तडक दुंदुभीच्या समोर जाऊन उभा राहिला. दुंदुभीला तेच हवे होते. त्याने वालीला युद्धाचे आव्हान दिले. दोघांनाही आपापल्या सामर्थ्याविषयी प्रचंड आत्मविश्वास होता. त्यांनी प्रथम एकमेकांना दुरुत्तरे करून त्वेष आणला. कोणीच मागे हटत नाही असे पाहून अखेर वालीने इंद्राकडून मिळालेली माळ गळ्यात घालून दुंदुभीवर चाल केली. त्या दोघांचे भीषण युद्ध सुरू झाले.

वालीने प्रथम दुंदुभीची शिंगे पकडून त्याला दूर फेकून दिले. पण थोड्याच वेळात सावरून दुंदुभीने वालीवर प्रति आघात केला. लाथा, बुक्क्या आणि वृक्ष, पाषाण यांचा एकमेकांवर मारा करत ते घोर युद्ध करणारे वीर एकमेकांचा घात करण्याची संधी पाहू लागले. परंतु काही काळाने वालीचा अधिक जोर झाला. त्याने दुंदुभीला वारंवार जमिनीवर पाडून त्याला खिळखिळा केला. अखेर दुंदुभीचा नाश झाला. परंतु युद्धाचा आवेश न ओसरलेल्या वालीने त्या गतप्राण दुंदुभीचे धूड उचलून एकाच हिसक्यात काही योजने दूरच्या अंतरावर फेकून दिले.

दुंदुभीच्या मृतशरीरातून यावेळी रक्तस्राव होत होता. वालीने दूर भिरकावलेले दुंदुभीचे शरीर जरी दूरवरच्या पर्वतारण्यात जाऊन पडले, तरी वाटेत असलेल्या मतंगमुनींच्या आश्रमात रक्तबिंदूंचा शिडकावा झाला. मतंगमुनींना अंतर्ज्ञानाने समजले की ते रक्तबिंदू एका

दैत्याच्या शरीरातले असून, वानरवीर वालीनेच तो दैत्य भिरकावला आहे. तेव्हा अत्यंत संतप्त होऊन त्यांनी शापवाणी उच्चारली की 'या माझ्या आश्रमाच्या वनभागात इतःपर वाली; त्याचे मंत्री किंवा त्याच्याशी सख्यसंबंध असलेले कोणी वानर आले तर त्यांचा तत्काल नाश होईल !' या शापवाणीची वार्ता समजली तेव्हापासून वाली आणि त्याचे अंकित वानर ह्यांनी हा ऋष्यमूक पर्वत आणि त्याचा आसमंत वर्ज्य केला.

मतंगमुनींचा शाप आणि त्याविषयीची पार्श्वभूमी यासंबंधीचा वृत्तान्त ऐकल्यावर हा ऋष्यमूक पर्वत आपल्याला राहण्याला योग्य आहे असे जाणून सुग्रीव तेथे राहू लागला होता. सुरक्षितता आणि स्वास्थ्य या दोन्ही दृष्टींनी सुग्रीवाला ऋष्यमूक पर्वतावरील निवास सुखाचा झाला होता. सुग्रीवावर वालीने केलेल्या अन्यायाची चीड बाळगणारे काही वानरमंत्रीही सुग्रीवाबरोबरच किष्किंधेतून बाहेर पडले होते.. तेही सर्वजण ऋष्यमूक पर्वतावर वास्तव्य करू लागले. त्यात वायुपुत्र हनुमानही होता. वालीच्या कृत्याचा त्या सर्वांना राग आलेला असला तरी प्रत्यक्षात ते त्याचा विरोध न करता जणू अज्ञातवासात राहिल्याप्रमाणे ऋष्यमूक पर्वतावर राहात होते. केव्हातरी यातून मार्ग निघेल असा विश्वास बाळगून ते सारे निमूटपणे त्या क्षणाची वाट पाहात राहिले होते.

म. ग्रं. सं. ठाणे,
बाल वाङ्मय विभाग
क्र. २००८ दि.
विषय बा. वा.

# ४

दैवाची योजना अज्ञात असते म्हणूनच आश्चर्यकारकही !

अयोध्येचा राजा दशरथ ह्याला मोठ्या नवससायासाने चार पुत्रांची प्राप्ती झाली. श्रीराम हा त्यातला ज्येष्ठ पुत्र आणि भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न हे रामाचे कनिष्ठ बंधू होते. अयोध्याधिपती दशरथ राजा अत्यंत पराक्रमी आणि धर्मपरायण होता. सर्व प्रजाजन त्याच्याविषयी प्रेम आणि आदर बाळगून असत. दशरथाने आपल्या पुत्रांना योग्य प्रकारे शिक्षण देऊन धर्म, नीती, राजधर्म, युद्धशास्त्र आणि शस्त्रास्त्रे यांत अत्यंत निपुण केले होते. राजपुत्र म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्यात हे पुत्र कमी पडणार नाहीत अशीच सर्वांची खात्री झाली होती. श्रीराम तर सर्वांना विशेष प्रिय आणि आदरणीय होता.

कालांतराने हे चारही पुत्र मोठे झाले. मध्यंतरी विश्वामित्र ऋषींच्या यज्ञकार्यात विघ्न आणणाऱ्या राक्षसांचा पराभव करण्यासाठी श्रीराम लक्ष्मणासह गेला होता. त्याला विश्वामित्रांनी अनेक अलौकिक अस्त्रांची विद्या दिली होती. श्रीरामाच्या पराक्रमाने विश्वामित्रांचा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. विश्वामित्र श्रीरामाच्या पराक्रमावर प्रसन्न झाले. त्यांनी यानंतर श्रीरामासह काही विशेष स्थळांना भेटीही दिल्या. त्यातच मिथिला नगरीत राजा जनकाकडेही ते आले. त्यावेळी जनकराजाची कन्या सीता हिच्या स्वयंवराचा प्रसंग योगायोगाने जमून आला.

सीतेच्या स्वयंवरासाठी शिवधनूला दोरी लावण्याचा पण लावला

होता. पण स्वयंवराला जमलेल्या कोणालाच तेवढी शक्ती दाखविता आली नाही. शिवधनूचा प्रचंड आकार आणि त्याचे वजन या दोन्ही गोष्टी प्रयत्न करणारांच्या आवाक्याबाहेरच्या ठरल्या. अखेर विश्वामित्रांच्या सूचनेवरून श्रीराम पुढे झाला आणि त्याने अत्यंत सहजतेने ते प्रचंड धनुष्य उभे केले. एवढेच नव्हे, तर श्रीराम जेव्हा त्या धनुष्याला दोरी लावण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा ते धनुष्यच कडकड आवाज करत मोडून गेले. श्रीरामाच्या अलौकिक सामर्थ्याने सारी सभा चकित झाली; राजा जनक आपल्याला मिळणारा हा पराक्रमी जावई पाहून खूष झाला आणि सीतेचा आनंद तर गगनात मावेनासा झाला. अशाप्रकारे शिवधनुर्भंग केल्यावर सीतेचे स्वयंवर झाले आणि आता लग्नाविषयी बोलणी सुरू झाली.

विश्वामित्रांच्या सूचनेवरून राजा जनकाने राजा दशरथाला पाचारण केले. श्रीरामाचा सीतेशी विवाह होणार होताच; तेव्हा त्याच वेळी जनकाने श्रीरामाच्या इतर तीन बंधूंचे विवाह आपल्याच कुटुंबातील मुलींशी लावले. राजा दशरथ आणि राजा जनक दोघांनाही हे नाते जोडताना आनंद झाला. उत्तम प्रकारे विवाह समारंभ पार पडला आणि नंतर राजा दशरथ आपले चार पुत्र, नवपरिणित सुना आणि सर्व परिवार बरोबर घेऊन अयोध्येला परतला. अयोध्यानगरीत काही काळ आनंदीआनंद चालला होता. आता दशरथ राजाने श्रीरामाला युवराजपदाचा अभिषेक करण्याचे ठरविले. सर्वांनाच ही योजना फार आनंदाची वाटली. पुन्हा एकदा उत्साहाने तयारी सुरू झाली. श्रीरामावरच्या प्रेमामुळे हा समारंभ उत्साहाने साजरा करण्यासाठी सर्वच अयोध्यावासी झटू लागले.

परंतु दैवाची योजना वेगळीच होती. श्रीरामाला युवराजपद देण्याच्या विचाराला कैकेयीराणीने मंथरानामक दासीच्या प्रेरणेने विरोध केला.

पूर्वी दशरथराजाकडून मिळालेल्या दोन वरांचा यावेळी उपयोग करून कैकेयीने श्रीरामाला वनवास आणि भरताला राज्याभिषेक अशाप्रकारे ते दोन वर वापरले. सर्वांनी खूप समजावले पण व्यर्थ ! कित्येकांनी याविरुद्ध कृती करण्याचे ठरवले पण श्रीरामाने सर्वांना शांत केले आणि आपल्या पित्याचा शब्द खरा करण्याच्या निश्चयाने वनवासाला जाण्याचे निश्चित केले. सर्वांना श्रीरामाच्या निर्णयाने खूप दुःख झाले आणि त्याचवेळी श्रीरामाच्या नीतीपूर्ण आचरणाचा आणि त्यागाचा अभिमानही वाटला. जेव्हा श्रीराम वनवासाला निघाला, तेव्हा अत्यंत निग्रहाने सीता आणि लक्ष्मण हेही वनात जायला निघाले. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण असे तिघे अयोध्येतून वनाकडे निघाले.

वनवासाचा श्रीरामाचा निर्णय ऐकून काही प्रजाजनही तिकडे जायला निघाले. परंतु श्रीरामाने कौशल्याने त्यांना टाळून वनगमनाचा निश्चय पार पाडला. गंगापार होऊन पुढे पुढे जात ती तिघे दक्षिणेकडे जात राहिली. अखेर दंडकारण्यात पंचवटीमध्ये त्यांनी पर्णकुटी बांधून राहायला सुरुवात केली. परंतु तेथे लंकाधीश रावणाची बहीण शूर्पणखा हीही वास्तव्य करून राहिलेली होती. त्या राक्षसीशी श्रीरामाचे वैर आले. लक्ष्मणाने तिचे नाक-कान कापले. रावणाच्या काही सेनापतींचा राम-लक्ष्मणांनी वध केला. या घटनांतून रावणाचा क्रोध ओढवला गेला. त्या क्रूर आणि कपटी रावणाने श्रीरामाला धडा द्यायचा निश्चय केला आणि शूर्पणखेने जिच्या सौंदर्याची फार प्रशंसा केली होती, त्या सीतेला रावणाने कपटाने पळवून नेले. श्रीराम फार फार दुःखी झाला. परंतु सीतेला काय झाले ते मात्र त्याला कळेना, तिला कोणी पळवून नेली असेल की राक्षसांनी तिचा घात केला असेल, काहीच निर्णय करता येईना. अखेर श्रीराम लक्ष्मणासह शोधाला निघाला.

श्रीरामाच्या सुदैवाने त्याची जटायू नावाच्या गृध्रराजाशी भेट झाली.

त्या जटायूने स्वतःच सीतेला सोडविण्यासाठी राक्षसराज रावणाशी युद्ध केले होते आणि तो प्राणांतिक अवस्थेत पडलेला होता. मरता मरता त्याने श्रीरामाला निदान दक्षिणदिशा दाखविली. श्रीराम दक्षिणदिशेकडे लक्ष्मणासह सीतेचा शोध करीत निघाला. पुढे दनू म्हणून दितीचा एक पुत्र शापामुळे राक्षस बनलेला होता, त्याच्याशी श्रीरामाची भेट झाली आणि त्यानेही मरताना श्रीरामाला मदत करण्याच्या बुद्धीने, सुग्रीव नामक वानरश्रेष्ठ ऋष्यमूक पर्वतावर राहात असून, त्याची मदत घ्यावी, अशी सूचना केली. अशा प्रकारे श्रीराम लक्ष्मणासह ऋष्यमूक पर्वताच्या आसमंतात आला.

आता सीतेच्या शोधासाठी हिंडणारा, एक प्रकारे संकटग्रस्तच, असा श्रीराम ऋष्यमूक पर्वताच्या आसमंतात येऊन सावधपणे सर्वत्र नजर फिरवत आणि त्याचवेळी वानरश्रेष्ठ सुग्रीवाचा शोध घेत हिंडत होता. ऋष्यमूक पर्वताच्या शिखरावर आपल्या वानर सहकाऱ्यांसह राहणारा सुग्रीव सतत सावधपणे आसमंत न्याहाळत राहात असताना, श्रीराम आणि लक्ष्मण सावधपणे टेहळणी करत त्या प्रदेशात हिंडत असताना पाहतो. त्याच्या मनात संशय निर्माण होतो की वालीनेच या दोघांना आपल्या नाशाकरता पाठविले नसेल ना ? लागलीच आपल्या ज्येष्ठ मंत्र्यांना एकत्र करून सुग्रीव या नव्या संकटासंबंधाने विचार-विनिमय करतो. सर्वानुमते वायुपुत्र हनुमानावर त्या दोघा नवख्या पुरुषांची भेट घेऊन, त्यांच्या आगमनाचा हेतू शोधून काढण्याची कामगिरी सोपविण्यात येते.

♣ ♣

# ५

ऋष्यमूक पर्वताच्या उंच शिखरांवरून खालचा अरण्याचा भाग सुस्पष्ट दिसत असल्यामुळे सुग्रीव आणि त्याचे सहकारी वानर बराच वेळ राम-लक्ष्मणांच्या हालचालींवर टेहळणी करत होते. तर राम-लक्ष्मण अत्यंत सावधानतेने थोडे थोडे पुढे सरकत होते आणि त्याचवेळी त्यांनी आपले धनुष्यबाणही सज्ज ठेवले होते. त्यांची दृष्टी चौफेर फिरून काही तरी शोधण्याचा प्रयत्न करते आहे हे त्यांच्या हालचालींवरून स्पष्टच दिसत होते. त्यामुळेच सुग्रीवादी वानरांना त्यांच्याविषयीं शंका उत्पन्न झाली. सुग्रीव म्हणाला की,

'ह्या दुर्गम वनामध्ये, वल्कले नेसून आणि शस्त्रसज्ज होऊन आलेले हे वीर निःसंशय वालीनेच पाठविलेले कोणी पुरुष असावेत!'

परंतु सुग्रीवासमवेत असलेला वायुपुत्र हनुमान मात्र सुग्रीवाशी सहमत नव्हता. बराच काळ राम-लक्ष्मणांना न्याहाळून पाहिल्यावर त्याची खात्री झाली की संशय येण्यासारखे ते नाहीत. मग तो सुग्रीवाला उद्देशून बोलला, 'हे सुग्रीवा, ह्या प्रदेश केवळ वालीलाच प्रवेश करायला प्रतिबंध करणारा नसून त्या वालीशी सख्य असणाऱ्या इतरांनाही या ठिकाणी प्रवेश करता येणार नाही. तेव्हा उगीच संशयग्रस्त होऊन नाना तऱ्हेच्या शंका घेणे उचित ठरणार नाही. तू विनाकारण धैर्य सोडून चंचल बुद्धीने भयग्रस्त होऊन जाऊ नकोस.'

यावर सुग्रीवाने युक्तिवाद केला. तो म्हणाला, 'हे वानरश्रेष्ठा, तुझे

धीर देणारे भाषण प्रसंगाच्या दृष्टीने योग्यच आहे. परंतु असे लक्षात घे की वाली राजा आहे; राजाला पुष्कळ मित्र असतात; म्हणूनच वालीने आजानुबाहू, सुदृढ आणि धनुष्यबाण, खड्ग अशी शस्त्रे धारण करणारे हे दोघे वीर पाठविले असावेत असा मला संशय आहे. असा संशय घेणे हे चुकीचे नाही. तेव्हा प्रथम ते कोण आहेत याचा कोणी-तरी शोध घेतला पाहिजे. मला वाटते इच्छेप्रमाणे रूप बदलण्याचे तुला सहज जमते. तेव्हा तूच सामान्य तापसाचे रूप घेऊन त्यांच्या संबंधात शक्य तेवढी माहिती संपादन कर. ते कोण, कोठले आणि इकडे आगमन होण्यामागची कारणे कोणती, हे सर्व तू कुशलपणे पाहून यावेस. '

वायुपुत्र हनुमानाने आपली जबाबदारी योग्यपणे ओळखली. त्याने वानराचे रूप टाकून सामान्य तापसाचा वेष आणि रूप धारण केले. अत्यंत सावधानतेने राम-लक्ष्मणांच्या दिशेने जाऊन त्यांच्यासमोर तो नम्रपणे येऊन उभा राहिला. नंतर त्याने हळूहळू श्रीरामाशी संभाषण सुरू करून त्यांच्याविषयी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. प्रथम हनुमानाने राम-लक्ष्मणांची प्रशंसा केली. त्यात राम-लक्ष्मणांच्या परा-क्रमाची, दिसण्याची, त्यांच्या शस्त्रसज्जतेची आणि त्यांच्या योग्यतेची प्रशंसा होती. नंतर हळूच हनुमानाने सुग्रीवासंबंधी काही बोलून त्यावरची श्रीराम आणि लक्ष्मण यांची प्रतिक्रिया सहज अजमावून पाहिली. यापुढे त्याने आपण सुग्रीवाचे मंत्री आहोत असेही सांगितले.

हनुमानाचे भाषण ऐकून श्रीराम आनंदित झाला. त्याने लगेच लक्ष्मणाला उद्देशून म्हटले, ' ऐक लक्ष्मणा, हा सुग्रीवाचा मंत्री आपल्या समीप आला आहे. या मंत्र्याचे भाषण त्याची विद्वत्ता, व्यासंग आणि बहुश्रुतता स्पष्ट दाखवत आहे. ज्याच्याजवळ असा कुशल मंत्री आहे त्याचे कार्य निःसंशय सिद्धीस जाईल.' श्रीरामाचे हे भाषण ऐकून

वायुपुत्राला संतोष झाला. त्यातच लक्ष्मण हनुमानाला म्हणाला, 'हे महात्म्या, सुग्रीवाच्या गुणांसंबंधाने आम्ही पूर्वी ऐकले आहे, आणि त्या वानरराज सुग्रीवालाच आम्ही शोधत आहोत. तेव्हा हे सज्जना, तू सांगशील तसे वागून आम्ही सुग्रीवाला भेटू. आम्हाला त्याच्याशी सख्य करायचे आहे.' त्यानंतर श्रीरामानेही लक्ष्मणाप्रमाणेच सुग्रीवासंबंधी सौम्य आणि मित्रभाव व्यक्त करणारे भाषण केले. आपली सुग्रीवाला भेटण्याची इच्छाही श्रीरामाने व्यक्त केली.

श्रीरामाचे भाषण ऐकून हनुमानाने जाणले की श्रीरामाचे सुग्रीवाशी काही काम आहे. त्याचवेळी हनुमानाच्या हेही लक्षात आले की श्रीरामाचे सुग्रीवाशी सख्य झाल्यास सुग्रीवालाही राज्यप्राप्ती होण्याच्या कार्यात मदत होणार आहे. म्हणून त्याने श्रीराम-लक्ष्मणांना त्यांच्याविषयीचा समग्र वृत्तान्त सांगण्याची विनंती केली. ती त्याची विनंती मान्य करून लक्ष्मणाने श्रीरामाविषयी सर्व वृत्तान्त कथन करण्यास आरंभ केला. त्याने राजा दशरथाचे आपण पुत्र असून, आपणास वनवासात कसे व का यावे लागले आहे याविषयी सविस्तर निवेदन केले. या निवेदनात त्याने आपला ज्येष्ठ बंधू श्रीराम याच्याविषयी हनुमानाला आदर आणि विश्वास वाटावा असेच त्याचे वर्णन केले.

तसेच पुढे पंचवटीतील वास्तव्यात राक्षसाकडून सीतेचे हरण कसे केले गेले आणि पुढे तिच्या शोधात भ्रमंती करत असताना कोणी व कसे साहाय्य केले याविषयी सांगितले. श्रीरामाच्या पराक्रमाचे आणि अलौकिक, असामान्य अशा सामर्थ्याचे वर्णनही त्याने केले. शिवाय दनु नामक शापित गंधर्वाने श्रीरामाला सुग्रीवाची मदत घेऊन सीतेच्या शोधाचा प्रयत्न करण्याविषयी सांगितले होते, श्रीराम म्हणूनच सुग्रीवाच्या शोधात ऋष्यमूक पर्वताकडे आला असल्याचे सांगून खात्री पटविण्याचा प्रयत्न केला.

लक्ष्मणाच्या भाषणाने वायुपुत्र हनुमानाची खात्री पटली की हे दोघे वीर वालीचे कोणी हितसंबंधी नसून सुग्रीवाशी सख्य करण्यासाठीच या प्रदेशात आले आहेत. मग तो हनुमान त्या दोघा बंधूंना सुग्रीवाचा पूर्व वृत्तान्त कथन करून त्यांना सुग्रीवाकडे चलण्याविषयी सूचना करून थांबला. श्रीरामाला लक्ष्मणाने सर्व प्रकारे हनुमानाशी झालेले संभाषण आणि सुग्रीवाची माहिती सांगून ऋष्यमूकाकडे चलण्याविषयी विनंती केली. श्रीरामाने काही काळ विचार करून आणि हनुमानावर विश्वास ठेवायला हरकत नाही असे ठरवून आपली संमती दिली. त्यानंतर हनुमान त्या दोघा वीरांना घेऊन ऋष्यमूक पर्वताकडे निघाला

# ६

श्रीराम आणि लक्ष्मण ह्यांना हनुमानाने ऋष्यमूक पर्वतावर आणून, तेथे थांबण्याची विनंती केली. मग तो एकटाच तेथून काही अंतरावर असलेल्या मलय पर्वतावर जेथे सुग्रीव आपल्या सहकारी वानरश्रेष्ठांसह थांबला होता तिकडे गेला. तेथे त्याने सुग्रीवाला सर्व वृत्तान्त कथन करून राम-लक्ष्मणाची भेट आणि मैत्री करण्यात सुग्रीवाचेही हित कसे साधणार आहे याविषयीचे आपले विचार स्पष्ट आणि सुसंगत पद्धतीने सांगितले. सुग्रीवाचा वायुपुत्र हनुमानाच्या बुद्धिमत्तेवर, चातुर्यावर आणि स्वामीहितदक्षतेवर विश्वास असल्याने त्यानेही राम–लक्ष्मणाची भेट घेण्याचे मान्य केले. मग आपला ठेवणीतला पोषाख आणि इच्छित रूप धारण करून सुग्रीव हनुमानासह ऋष्यमूक पर्वतावर आला.

श्रीराम आणि सुग्रीव ह्यांनी एकमेकांचे स्वागत केले, एकमेकांचे हात हातात घेऊन सहकार्याची भावना व्यक्त केली, आणि परस्परांना संकटात साहाय्य करण्याचा निश्चय बोलून दाखविला. या वेळपर्यंत रामाकडे जाताना सामान्य तापसाचा वेष धारण केलेल्या हनुमानाने आता आपले पूर्वरूप म्हणजे वानराचे रूप धारण केले होते. त्या हनुमानाने राम-सुग्रीवांच्या या मित्रभावाला स्थिर स्वरूप देण्याच्या हेतूने दोन लाकडांपासून अग्नी उत्पन्न केला. त्या अग्नीची मनोभावाने पूजा केली आणि तो अग्नी राम-सुग्रीवांच्या मध्यभागी स्थापन केला. त्यानंतर त्या अग्नीच्या साक्षीने राम-सुग्रीवांनी आपल्या मित्रभावाचा उच्चार

करून अग्नीची पूजा आणि प्रदक्षिणा पूर्ण केली.

सुग्रीव आता प्रसन्न मनाने श्रीरामाशी बोलू लागला. सुग्रीव म्हणाला, ' हे रामचंद्रा, आपल्याला माझी पूर्वकथा ह्या माझ्या मंत्री हनुमानाकडून समजलीच आहे. मी माझ्या बंधूच्या म्हणजे वालीच्या भयाने असा अरण्यवासी बनलो आहे. विशेषतः त्याने माझी भार्याही बलाने अपहरण केली असल्याने मला फार दुःख होत आहे. तेव्हा वालीकडून माझ्यावर झालेल्या अन्यायाचे काही तरी उपायाने परिमार्जन व्हावे या माझ्या इच्छेला तुम्ही साथ द्या.' सुग्रीवाच्या या विनंतीला श्रीरामाने जे उत्तर दिले त्यामध्ये वीराला उचित असा आत्मविश्वास होता. श्रीराम शेवटी म्हणाला, ' सुग्रीवा, माझ्या अपराजित अशा या बाणांनी मी वालीला तुझ्यासमोर भूमीवर कोसळून पडलेल्या अवस्थेत दाखवीन ! '

श्रीरामाच्या त्या वीरश्रीयुक्त भाषणाने सुग्रीवाला पुष्कळच धीर आला. तेव्हा सुग्रीवाने श्रीरामाला म्हटले, ' हे वीरश्रेष्ठा रामा, तुम्ही बंधू कोणत्या निमित्ताने वनवास पत्करून आलात; पुढे ह्या वनवासात तुझी भार्या राक्षसाने हरण कशी केली आणि तिच्या शोधार्थ निघालेले तुम्ही उभयता या वनप्रदेशात कसे आलात याविषयीचा सर्व वृत्तान्त मला वीर हनुमानाने कथन केला आहे. तेव्हा मीही तुला शब्द देतो की माझ्याकडून तुझ्या भार्येचा शोध लावण्यात सर्व सामर्थ्याचा उपयोग केला जाईल हे निश्चित ! ' यानंतर सुग्रीवाने श्रीरामाला विश्वास वाटावा अशी एक घटना कथन केली. तो म्हणाला,

' हे रामा, हा योग मोठा पवित्र दिसतो की तुझी आणि माझी भेट झाली. मी तुझी भार्या मैथिलीच पाहिली असावी. एक दिवस आम्ही वानर या पर्वताच्या उतुंग शिखरावर बसलो असतांना आकाशमार्गाने रावण नामक एक क्रूर राक्षस एका स्त्रीला घेऊन जात असलेला आम्ही पाहिला. ती स्त्री त्या राक्षसाच्या हातामधून सुटण्यासाठी नागराजाच्या

स्त्रीप्रमाणे धडपड करत होती. त्याचवेळी मुखाने ' हे रामा, हा लक्ष्मणा असा आक्रोशही करत होती. त्या स्त्रीने आम्हा पाच वानरांना पर्वतावर बसलेले पाहून आपले उत्तरीय वस्त्र आणि काही अलंकार टाकून दिले. ते आम्ही गोळा करून ठेवले आहेत. तू ते पाहून ओळख. '

सुग्रीवाने लगेच आपल्या सेवकांना आज्ञा करून पर्वतावरील गुहेतून ते उत्तरीयात बांधून ठेवलेले अलंकार आणविले. श्रीराम त्या उत्तरीयाचे आणि अलंकारांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून लगेच म्हणाला, ' होय होय, हे माझ्या प्रिय सीतेचेच आहेत. ' पण यापुढे काही बोलण्याच्या अवस्थेत श्रीराम राहिला नाही. त्या प्रिय वस्तूंच्या दर्शनाने त्याला अनावर शोक झाला. डोळयांतून अश्रू गाळत आणि मुखाने ' प्रिये सीते ' असे शब्द काढत काही काळ श्रीराम मान खाली करून बसून राहिला. नंतर लक्ष्मणाने त्या वस्तू पाहून, विशेषतः त्यातील पायात घालायच्या तोरड्या पाहून त्या सीतेच्याच असल्याची खात्री व्यक्त केली. काही वेळ त्या दोघा बंधूंनी अशा प्रकारे शोक प्रकट केल्यावर मग ते थोडे शांत झाले.

श्रीराम म्हणाला, ' हे सख्या, मित्रा सुग्रीवा, माझी प्रिया कोणत्या राक्षसाने हरण केली ? तिला कोठे नेले ? माझ्या प्रियेला दुःख देणाऱ्या त्या राक्षसाचे स्थल काय ? हे सर्व तू मला सांग. त्या राक्षसाचाच नव्हे तर अखिल राक्षसकुलाचा मी संहार करीन ! ' श्रीरामाच्या क्रोधयुक्त भाषणाने श्रीरामाचे दुःख किती तीव्र आहे याची सर्वांनाच कल्पना आली. काही वेळ जाऊ दिल्यावर सुग्रीव नम्रपणे म्हणाला,

' हे रामा, त्या राक्षसाचे कुल, स्थल याची आम्हाला काहीही माहिती नाही. परंतु हे महापराक्रमी श्रेष्ठा, आम्ही सर्व सामर्थ्यानिशी सीतेचा शोध करू आणि तुला संतोष देऊ. तू स्वतः मात्र धीर सोडू नकोस. खरे तर मीही तुझ्याप्रमाणे पत्नीच्या विरहाने व्याकुळ झालेलो आहे. परंतु वानर

असून सुद्धा मी धीर सोडत नाही; मग तुझ्यासारख्या महाबुद्धिवान, धैर्यवान् आणि महापराक्रमी वीराला असे वागून कसे चालेल? मी काही तुला उपदेश करत नाही, तर मित्रभावाने तुझे सांत्वन करतो आहे.'

सुग्रीवाचे ते भाषण ऐकताच श्रीरामाने स्वतःला सावरले. तो म्हणाला, 'मित्रा सुग्रीवा, तुझे हितकारक आणि मित्रप्रेमाने केलेले भाषण पूर्णतया योग्य आहे. तुझी कर्तव्यनिष्ठा पाहून मला संतोष झाला आहे. मला आज एक चांगला मित्र लाभल्याचे समाधान वाटत आहे. त्या दुरात्मा रावणाचा मी निःसंशय वध करीन; पण तू त्याच्या निवासस्थलाचा शोध तेवढा लाव. तसेच मी तुझे प्रिय करण्यासाठी काय करू हेही सांग. मी जे बोलतो ते करतो, हे तू विश्वासपूर्वक ध्यानात ठेव.' श्रीरामाचे हे वीरश्रीयुक्त भाषण ऐकून सर्वांना आनंद झाला. सुग्रीव म्हणाला, 'खरोखर रघुकुलोत्पन्न रामचंद्रासारखा मित्र मला अशा संकटकाळात लाभला हा दैवाचा माझ्यावर मोठाच अनुग्रह आहे.'

यानंतर श्रीराम आणि सुग्रीव यांनी मित्रभावाचा पुनरुच्चार करून पुढील कार्याविषयी विचार करण्याचे ठरविले.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ......... दिनांक .......
विषय ......... क्र. .........

# ७

श्रीराम आणि सुग्रीव एवढा वेळ भावनेच्या भरात होते आणि उभ्यानेच त्यांचे बोलणे चालू होते. आता मात्र सुग्रीवाच्या लक्षात आले की आपण श्रीराम आणि लक्ष्मण ह्यांचे आतिथ्य असे काहीच केलेले नाही. तेव्हा त्याने भिरभिरत्या नजरेने चहूकडे पाहिले आणि त्याची नजर एका तालवृक्षावर स्थिरावली. सुग्रीवाने लागलीच स्वतःच जाऊन त्या तालवृक्षाची प्रफुल्लित, थोड्याशाच पानांनी युक्त असलेली आणि भ्रमरांनी सुशोभित केलेली अशी एक फांदी कडकन् तोडली आणि आसनाप्रमाणे ती भूमीवर मांडून त्याने रामाला तीवर बसविले. तो स्वतःही त्याच फांदीवर बसला. राम-सुग्रीव आसनस्थ झालेले पाहताच, हनुमानानेही दुसरी तशीच एक फांदी तोडून जवळच मांडली आणि लक्ष्मणाला तीवर बसवले.

आता शांतपणे एखाद्या महालात बसून सुखदुःखाच्या गोष्टी कराव्यात तसा त्या सर्वांचा सुखसंवाद सुरू झाला. त्याचवेळी आणखी काही वानरश्रेष्ठ फळे, कंद असे खाण्याचे पदार्थ घेऊन तेथे आले. सर्व मंडळींनी श्रमपरिहार करता करता गोष्टी चालू केल्या. सुग्रीव म्हणाला, ‘श्रीरामा, माझा ज्येष्ठ बंधू वाली महापराक्रमी असून त्याने मला राज्यभ्रष्ट तर केलेच आहे, परंतु माझ्या प्रिय पत्नीचा अपहारही केला आहे. शिवाय तो सतत माझ्या नाशाकरता त्याच्या पक्षातील वानरांना पाठवत असतो. त्यामुळे तुम्हा बंधूंना पाहताच मला तुम्ही वालीनेच पाठविलेले

कोणी आहात असा तुमच्याविषयी संशय आला. मी त्याबद्दल तुमची क्षमा मागतो.'

श्रीराम म्हणाला, 'छे: छे:! यात तुझे वर्तन नि:संशय योग्यच होते. पण सुग्रीवा, आता मित्र म्हणून मी तुला वचन देतो की तुझ्या शत्रूचा म्हणजे त्या वालीचा मी वध करून तुला सुखी झालेला पाहीन. परंतु तत्पूर्वी तुझा सर्व वृत्तान्त सविस्तर ऐकण्याची माझी इच्छा आहे. त्यामुळे तुझ्यावरचा अन्याय ऐकून माझा क्रोध प्रबल होईल आणि मग मी वालीचा क्षणार्धात वध करीन.' श्रीरामाचे शब्द ऐकून सुग्रीवालाही आनंद झाला. त्याने आपल्या जीवनातील वालीच्या संबंधातला सर्व वृत्तान्त सविस्तर निवेदन केला. वालीला मतंगमुनींनी दिलेल्या शापामुळे निर्वेध आणि वालीच्या भयापासून मुक्त असलेल्या ह्या ऋष्यमूकादी पर्वतांच्या आश्रयाने आपण सध्या कसे राहात आहोत इथवर सर्व माहिती सुग्रीवाने रामाला सांगितली. शेवटी सुग्रीव कंपायमान होत म्हणाला, 'हे पाहिलेस रामा, केवळ वालीच्या आठवणीनेच मी कंपित झालो आहे. त्या वालीचे सामर्थ्यच तसे अचाट आहे. हा पाहिलास वालीकडून नाश पावलेल्या दुंदुभी राक्षसाच्या अस्थींचा पर्वत! तसेच ही जी मोठमोठ्या शाखांनी युक्त असलेल्या प्रचंड सात सालवृक्षांची रांग दिसते आहे ना, ती वाली शेजारून वेगाने गेला तर तेवढ्यानेही कंपित होऊन, पर्णरहित होऊन, वाकते. अशा प्रकारचे अतुल बल असलेल्या वालीचा वध ही गोष्ट सोपी नाही. तुला तरी ते कसे साधणार?'

सुग्रीवाची ती अवस्था पाहून जवळच बसलेल्या लक्ष्मणाने हसत हसत त्याला विचारले, 'काय केले असता श्रीरामाच्या सामर्थ्याविषयी तुला विश्वास वाटेल?' तेव्हा सुग्रीव म्हणाला, 'काय नी कसे सांगू! पूर्वी एकाच वेळी या सातही सालवृक्षांची वालीने दुर्दशा केलेली

मी पाहिली आहे. श्रीरामाने ह्यांपैकी एक जरी वृक्ष बाणाने विदीर्ण केला तरी मला धीर येईल. तसेच श्रीरामाने या दुंदुभीच्या अस्थींचा ढीग एका पायाने उडवून निदान दोनशे धनुष्ये दूर फेकून दाखविला तरीही मी वालीच्या वधाचा विचार करू शकेन.' सुग्रीवाने असे सांगितल्यावर लक्ष्मणाने श्रीरामाकडे पाहून हसल्यासारखे केले. ते सुग्रीवाच्या लक्षात आल्यावर तो म्हणाला, 'आपण उभयता बंधू माझ्या बोलण्याचा राग मानू नका. माझ्या मनाची अवस्था अत्यंत चमत्कारिक झालेली असल्यानेच मी हे बोलतो आहे.'

त्यावर श्रीरामाने सुग्रीवाचे सांत्वन करण्यासाठी म्हटले, 'मित्रा, यात राग कशाचा! तू समरांगणात माझा पराक्रम पाहिलेला नाहीस आणि वालीचा पाहिला आहेस म्हणून तुझ्या मनात शंका येणे स्वाभाविकच आहे. पण तुझ्या मनातली शंका काही प्रमाणात निरसन व्हावी म्हणून मी आताच तुला प्रचीती देतो.' असे बोलून श्रीरामाने जवळच पडलेले दुंदुभीचे शरीर पायाच्या अंगठ्यावर तोलून अजमावले आणि लगेच शंभर योजने दूर भिरकावले. ते पाहून सुग्रीवाने हात जोडून म्हटले, 'हे रामा, तुझ्या सामर्थ्याची मला कल्पना आली. तरीही वालीशी तुझी तुलना करण्यास माझे मन कचरतेच आहे.' लक्ष्मणाने याचे कारण विचारल्यावर सुग्रीव म्हणाला, 'अस्थी, मांस आणि रुधिर ह्यांनी युक्त असणारे त्या दुंदुभीचे शरीर माझ्या श्रांत झालेल्या बंधूने फेकून दिले होते. श्रीरामाने आता फेकलेले शरीर अस्थी, मांस इत्यादींनी विरहित आणि म्हणून हलके झाले असणे शक्य आहे. आता सालवृक्षांबाबत होणारी कृती ही मात्र निःसंशय खात्री पटविणारी ठरेल.'

सुग्रीवाच्या ह्या प्रामाणिकपणाने संतुष्ट झालेल्या श्रीरामाने काही न बोलता आपला हात पुढे करून धनुष्य पेलले. त्याबरोबर लक्ष्मणाने श्रीरामाचा बाणांचा भाता त्याच्यासमोर धरला. तेव्हा भात्यातून एक

बाण काढून घेऊन त्या वीराग्रणी श्रीरामाने आपल्या धनुष्यावर दोरी चढवून टणत्कार केला. त्यावेळी एवढा प्रचंड आवाज झाला की त्या आवाजाने दशदिशा व्यापून टाकल्या. नंतर रामाने धनुष्यावर बाण चढवून, काही काळ एकाग्र अवस्थेत राहून, सालवृक्षाकडे बाण सोडला. पाहता पाहता त्या सुवर्णभूषित बाणाने एवढा वेग घेतला की त्याने सातही सालवृक्ष भेदून, त्या वृक्षांना आधारभूत असलेले पर्वतशिखर भेदले आणि अखेर तो बाण रसातलात प्रविष्ट झाला. एवढेच नव्हे तर पुन्हा उड्डाण करून बाणाने भात्यात प्रवेश केला. हा सारा प्रकार पाहून भय, विस्मय, कंप अशा अवस्थांमधून ते सारे वानर जाऊन, स्तब्धपणे नुसते 'आ' करून पाहातच राहिले.

सुग्रीवाला काही काळ काय करावे, काय बोलावे हे सुचेनासेच झाले. त्या विदीर्ण झालेल्या सातही सालवृक्षांची अवस्था अवलोकन करता करता एकदमच तो भानावर आला आणि त्याने सर्वांसमक्ष श्रीरामाला साष्टांग नमस्कारच घातला. श्रीरामाने त्याला उठवले तेव्हा हात जोडून कृतकृत्य भावनेने सुग्रीव म्हणाला, 'हे रघुकुलोत्पन्ना रामा, मला माझ्या पूर्वीच्या बोलण्याची लज्जा वाटत आहे. पण मी त्यावेळी जे बोललो, ते माझ्या भयग्रस्त मनाला वालीच्या संबंधात जो धाक वाटत होता, त्यामुळेच बोललो. तेव्हा ते तू मनावर न घेता माझ्याविषयी मित्रभाव धर. तुझ्या सामर्थ्याविषयी माझी स्वतःची तर खात्री झालीच आहे. पण तुझे अलौकिक सामर्थ्य, असामान्य कर्तृत्व आणि चमत्कृतिपूर्ण कौशल्य पाहून मला तर वाटते आहे की या पृथ्वीतलावरच नव्हे, तर देवादिकांमध्येही कोणी तुझ्याशी तुल्यबल नसेल. मग वालीची काय कथा? मी मात्र तुझ्यासारखा वीरश्रेष्ठ मित्र म्हणून लाभल्याने धन्य झालो आहे !'

♣ ♣

# ८

श्रीरामाने सुग्रीवाला आनंदाने आलिंगन देऊन आपल्या मनात त्याच्याबद्दल कोणताही दुजाभाव नाही हे स्पष्ट दाखवून दिले. नंतर श्रीरामाने सुग्रीवाला सांगितले की त्याने वालीला आव्हान द्यावे. त्या सूचनेप्रमाणे सर्वजण किष्किंधेकडे निघाले. तेथे पोचल्यावर एकटा सुग्रीव कंबर कसून उभा राहिला आणि इतर सर्वजण आजूबाजूच्या झाडावेलींच्या मागे लपून राहिले. सुग्रीव मैदानात उभा राहून प्रचंड गर्जना करत होता. त्याने एकामागून एक गर्जना आणि आव्हाने देऊन वालीला जाग आणली. सुग्रीवाचे आव्हान आणि त्याच्या गर्जना ऐकून वालीला चीड आली. तो वेगावेगाने सुग्रीवाचा नक्षा उतरवण्याच्या ईर्षेने निघाला.

त्यानंतर वाली आणि सुग्रीव यांचे तुमुल युद्ध सुरू झाले. एकमेकांना हातांनी आणि मुठींनी प्रहार करून ते परस्परांचा घात करू पाहात होते. त्या दोघांचे युद्ध चालू असताना कधी उभ्याने ते एकमेकांना घट्ट कवळत होते, कधी परस्परांच्या अंगाखाली एकमेकांना चेपत होते, काही वेळा गरगरा फिरत आणि एकमेकांना फिरवत होते. वाली आणि सुग्रीव यांची ही झुंज चालू असताना, एका झाडाच्या आड उभा राहून, धनुष्यावर बाण चढवून, श्रीराम वालीचा वेध करण्याची संधी पाहात होता. परंतु त्याची मोठीच अडचण झाली होती. कारण वाली आणि सुग्रीव हे अगदी सारखे दिसत होते. त्यामुळे राम बाण सोडू शकत नव्हता. अखेर रामाने

बाण सोडण्याचा निर्णयच सोडून दिला.

वालीशी युद्ध करणारा सुग्रीव थकत चालला होता. श्रीराम आता बाण सोडून वालीचा वध करील या आशेवर सुग्रीव जोर धरून झगडत होता. पण बराच वेळ गेला तरी रामाचा बाण सुटलाच नाही. वालीने सुग्रीवाला चांगलाच बुकलला होता. अखेर वालीचा मार सहन न होऊन सुग्रीव पराभव मान्य करून पळत सुटला. वालीने त्याचा पाठलाग करून त्याला पकडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण अखेर सुग्रीव ऋष्यमूक पर्वताजवळील अरण्यात कसाबसा पोहोचला आणि वाली शापभयामुळे पुढे न जाता मागे फिरला. यावेळी तरी सुग्रीव वाचला होता.

सुग्रीव पोहोचल्यावर काही वेळातच श्रीराम, लक्ष्मण आणि हनुमानादी वानरवीर तेथे आले. सुग्रीव रक्ताने माखलेला आणि आघातांचे वळ अंगावर उठलेले अशा अवस्थेत श्रांत होऊन जमिनीवर पडलेला होता. श्रीरामाला आलेला पाहताच तो दीनवाणीने म्हणाला, ‘ वालीला आव्हान देऊन राजवाड्याबाहेर काढ, त्याच्याशी युद्ध कर असे मला सांगून, स्वतःच्या पराक्रमाविषयी प्रचीती देऊन, रामा तू हे काय केलेस ? तुला बाण मारायचा नव्हता तर माझा सुखाचा वनवास सोडून मी तिथे पराभव पत्करायला गेलोच नसतो. ’

यावर श्रीरामाने अत्यंत समजुतदारपणे सुग्रीवाला म्हटले, ‘ हे सुग्रीवा, जे घडले त्याचे मलाही दुःखच होते आहे. तू न रागावता मी बाण का सोडला नाही हे नीट ऐकून घे. अरे, तुम्हा दोघा भावांची शरीरयष्टी, चालण्याची आणि उभे राहण्याची पद्धत, या सर्वांमध्ये एवढे साम्य आहे की तुम्हा दोघांना वेगळे वेगळे ओळखणे माझ्यासारख्याला अगदीच अवघड आहे. एवढेच कशाला अरे तुमचे पाहणे, बोलणे, आवाज यात सुद्धा विलक्षण साम्य आहे. त्यामुळे तुम्ही दोघे माझ्यापासून काही अंतरा-

वर जेव्हा एकमेकांशी झुंज देत होतात, तेव्हा त्यातला तू कोणता आणि वाली कोणता हेच मला समजेनासे झाले. त्यात मी जर चुकीने तो बाण सोडलाच असता तर तुम्हापैकी एकाचे प्राण निःसंशय संपले असते. दुर्दैवाने तूच त्या बाणाचा बळी झाला असतास तर ! त्यामुळे आपल्या दोघांच्याही कार्याचा नाश झाला असता.

श्रीरामाने केलेले स्पष्टीकरण सुग्रीवाने ऐकल्यावर त्याला ते पटले. त्याचा राग आणि त्याचे दुःख काही प्रमाणात निवळले. तेव्हा त्याला धीर यावा म्हणून राम पुढे म्हणाला, ' सुग्रीवा, मनातून शंका काढून टाक. मन शांत कर. धीर धरून पुढील कार्याची दिशा आणि अखेर मिळणारा विजय यावर विचार कर. तू पुन्हा युद्ध कर आणि त्यावेळी खुणेची अशी काही वस्तू मला दिसेल अशा तऱ्हेने शरीरावर धारण कर. यावेळी तुला निश्चित वाली माझ्या बाणाने जर्जर होऊन भूमीवर तडफडत पडलेला दिसेल. '

सुग्रीवाला श्रीरामाचे बोलणे ऐकून चांगलाच आत्मविश्वास वाटू लागला. आपली दमणूक नाहीशी होण्याची आणि खूण म्हणून काय धारण करावे याचा विचार करत राहण्याची जेवढी विश्रांती तेवढीच घेऊन सुग्रीव पुन्हा युद्ध करण्याच्या ईर्षेने सिद्ध झाला. तेवढ्या वेळात लक्ष्मणाने तेथील पर्वततटावर उगवलेल्या प्रफुल्लित नागपुष्पीलता उपटून आणून त्यांची एक माळ सिद्ध केली होती. ती माळ गळ्यात घालून सुग्रीव लगेचच पुन्हा किष्किंधेकडे निघाला. सुग्रीवाच्या मागोमाग श्रीराम, लक्ष्मण आणि इतर वानरवीर हेही सर्व किष्किंधेकडे गेले.

किष्किंधेच्या आसमंतात येताच श्रीराम आणि इतर सर्वजण तेथील वनामधील वृक्षांच्या आड उभे राहिले. सुग्रीव त्यावेळी नागपुष्पीलतेची माला कंठात घालून, अत्यंत आत्मविश्वासाने चालत थोडा पुढे गेला. नंतर

त्याने एकदा श्रीरामाकडे पाहून घेतले आणि विलंब न लावता त्याने गर्जना करण्यास आरंभ केला. सुग्रीवाने आपल्या कडकडीत गर्जनायुक्त गगनभेदी आवाजात वालीला युद्धासाठी आव्हान दिले. वालीला ती अपमानास्पद घोषणा ऐकून राग आला आणि तो तडक सुग्रीवाकडे जाण्यासाठी निघाला. त्याला अडवून त्याच्या कुटुंबियांनी त्याला थोडा धीर धरण्याची विनंती केली. परंतु वाली कोणाचेही ऐकण्याच्या मनः-स्थितीत नव्हता. एखाद्या क्रुद्ध भुजंगाप्रमाणे तो सुग्रीवावर चाल करून गेला.

वाली आणि सुग्रीव समोरासमोर येताच ते एकमेकांना दूषणे देत आपल्या मनातला राग वाढवू लागले, द्वेष चढवू लागले आणि असा एक क्षण आला की दोन मेघांची आकाशात टक्कर होते, तसे ते दोन वीर एकमेकाला भिडून आघात करू लागले. यावेळी त्यांनी वज्रमुष्टी, पाय, शिर आणि सर्व अंगाच्या धडका यांचा तर अवलंब केलाच पण त्याचबरोबर वृक्ष आणि पर्वतखंड यांनीही एकमेकांवर आघात केले. ते युद्ध अत्यंत उग्र आणि भीषण होते. एखाद्या निर्णायक युद्धाच्या ईर्षेने ते दोघेही वीर एकमेकांशी झुंजत होते. अखेर एका विशिष्ट क्षणी श्रीरामाने एक विजेसारखा तेजस्वी बाण काढून वालीवर सोडला. त्या बाणाचा तडाखा बसताच तो महापराक्रमी वाली, वृक्ष कोसळावा तसा जमिनीवर कोसळला. काही काळ मरणोन्मुख अवस्थेत तडफड करून अखेर वाली गतप्राण झाला.

वालीच्या निधनाने त्याची पत्नी तारा, पुत्र अंगद आणि इतरही किष्किंधावासी वानरगणांना अपार शोक झाला. त्या सर्वांनी निरनिराळ्या प्रकारे आणि अनेक शब्दात आपले दुःख प्रकट केले. नंतर हळूहळू त्यांनी एकमेकांचे सांत्वन करीत दुःख आवरले. वालीच्या मृत्यूने

सुग्रीवालाही दुःख झालेच होते. आता काहीशा त्रयस्थपणाने लक्ष्मणाने तेथील सर्वांना बोध करून शांत केले आणि वालीच्या मरणोत्तर संस्कारांची त्यांना आठवण करून दिली. मग एका मूल्यवान शिविकेतून वालीची अंत्ययात्रा निघून, दूर नदीच्या काठावर सुग्रीवाच्या नेतृत्वाखाली राजाच्या सन्मानाने वालीला मिरवत आणून, त्याच्या मृतदेहाचे दहन करण्यात आले.

♣ ♣

# ९

२००८ २५।९८
पो.वा.

वालीच्या वधानंतर सुग्रीव आणि हनुमानादी वानरवीरांना, निर्वंध झालेली किष्किंधानगरी आता सुग्रीवाकडे पोरकेपणाने पाहात असल्याप्रमाणे भासत होती. तेव्हा किष्किंधेतील वानरजनांनी सुग्रीवाला नगरप्रवेश करण्यासाठी विनंती केली. त्यावेळी सुग्रीव आणि हनुमानादी वानरवीर श्रीरामाच्या समीपच उभे होते. तेव्हा सुग्रीवाच्या मार्फत म्हणून हनुमान म्हणाला, ‘ हे रघुवंशतिलका रामचंद्रा, आमचा नायक जो सुग्रीव त्याला हे राज्य तुझ्याच कृपेने प्राप्त झाले आहे. तेव्हा आपल्या सुहृदांसह सुग्रीवाला नगरीत प्रवेश करण्यास तू अनुज्ञा दे. तसेच तूही आपल्या ह्या कनिष्ठ बंधूसह नगरीत येऊन सुग्रीवाकडून यथोचित सन्मान आणि पूजा यांचा स्वीकार कर. आम्हा सर्व वानरगणांना त्यामुळे विशेष आनंद होईल. ’

हनुमानाचे भाषण ऐकल्यावर श्रीराम म्हणाला, ‘ हे वानरवीरहो, तुमच्या कृतज्ञतेच्या भावनेने केलेल्या आमंत्रणाचा मला स्वीकार करता येणार नाही याचे मलाच विशेष दुःख होते आहे. कारण चौदा वर्षे पूर्णपणे वनवासात राहण्याची आणि तत्पूर्वी ग्रामात अथवा नगरात प्रवेश न करण्याची प्रतीज्ञा मी पित्याच्या आज्ञेने केली आहे; ती मला पूर्ण केलीच पाहिजे. सुग्रीवाने मात्र अवश्य नगरप्रवेश करावा आणि त्याला यथाविधी सत्वर राज्याभिषेकही व्हावा, तसेच तुम्ही ह्या वालीपुत्र अंगदाला युवराज करून त्यालाही यौवराज्याभिषेक करा. ’ श्रीरामाची

ही आज्ञा सर्वांनी शिरसामान्य करून त्याप्रमाणे करण्याचे ठरविले.

सुग्रीवाने यानंतर सर्व वानरगणांसह किष्किधानगरीत प्रवेश केला. नंतर सर्व मंत्र्यांनी विचारपूर्वक यथाविधी राज्याभिषेक केला. याचवेळी मोठ्या समारंभपूर्वक सुग्रीवाने आपली पत्नी रुमा हिचाही स्वीकार केला. त्यानंतर सुग्रीवाने राजा म्हणून दिलेल्या आज्ञेनुसार वालीचा पुत्र अंगद ह्याला युवराज म्हणून अभिषेक करण्यात आला. सुग्रीवाच्या या आज्ञे-मुळे वालीवर निष्ठा ठेवणाऱ्या त्याच्या अनुयायांना, वालीच्या कुटुंबियांना विशेष आनंद झाला. सुग्रीवाच्या संबंधात त्यांच्या मनात असलेली अढी दूर होऊन ते सर्व त्याच्याविषयी प्रेम आणि आदर बाळगू लागले.

किष्किधेत राज्यव्यवहारदृष्ट्या थोडी स्थिरस्थावर झाल्यावर सुग्रीव आपले कुटुंबीय, युवराज अंगद आणि मंत्रिगण यांच्यासमवेत श्रीराम थांबला होता तेथे आला आणि त्यांनी श्रीरामाचा तेथे सन्मान केला. नंतर श्रीरामाचा बंधू लक्ष्मण याचाही सन्मान केला. श्रीराम आणि लक्ष्मण ह्यांनी सुग्रीवाचे, त्याच्या कुटुंबियांचे, अंगदाचे आणि किष्किधावासी वानरगणांचे अभिष्टचिंतन केले. मग सर्वांचा निरोप घेऊन, सुग्रीवाने सुचविल्याप्रमाणे राम-लक्ष्मण किष्किधेहून निघून प्रस्रवण पर्वतावर आले.

प्रस्रवण पर्वताच्या एका उंच शिखरावर एक विस्तीर्ण गुहा होती. ती वास्तव्य करण्याला सर्वथा योग्य होती. तेथेच श्रीराम आणि लक्ष्मण राहणार होते. श्रीरामाने वचन दिल्याप्रमाणे सुग्रीवाला साहाय्य करून, वालीचा वध करून, सुग्रीवाला राज्य आणि पत्नी ह्यांचा लाभ करून दिला होता. आता श्रीरामाला सीतेचा शोध घेण्याचे कार्य करायचे होते आणि त्यासाठी सुग्रीवाचे साहाय्य मिळणार होते. परंतु आता वर्षाकाल जवळ आला असल्याने सीतेच्या शोधाला अनुकूल काल

नव्हता. म्हणूनच सुग्रीवाने श्रीराम आणि लक्ष्मण ह्यांना विनंती केली होती की त्यांनी हा वर्षाकाल टळून जाईतो या प्रस्रावण पर्वतावर काही दिवस राहावे. हा पर्वत तसा किष्किंधेच्या फार जवळ नव्हता आणि तेथून दूरही नव्हता.

श्रीरामाने व्यवहारदृष्ट्या सुग्रीवाचे म्हणणे मान्य केले होते. पण मनाने मात्र तो अतिशय अस्वस्थ होता. लक्ष्मणाबरोबर बोलताना वारंवार तो सीतेच्या आठवणी काढून दुःख प्रकट करत होता. यावेळी आपले दुःख बाजूला करून श्रीरामाचे सांत्वन करण्याचे काम लक्ष्मणाला करावे लागायचे. मग कधी तिथल्या निसर्गाचे रमणीय स्वरूप वर्णन कर, कधी त्या पर्वतावर आढळणाऱ्या पशू-पक्ष्यांच्या हालचालीतल्या गमती वर्णन कर, कधी आकाश न्याहाळून त्यातील ग्रह-नक्षत्रांचीच माहिती विचार, असे करून कसेतरी दिवस काढावे लागत. पण लक्ष्मण रामावर अतिशय प्रेम करत होता. त्याच्याकडून रामाचे दुःख पाहावत नसे. यामुळे कधी कधी तो स्वतःच दुखीः होई. मग त्या दुःखी पण अगतिक अवस्थेत असलेल्या दोघा बंधूंना एकमेकांचे सांत्वन करण्याशिवाय गत्यंतरच उरत नसे. असा त्यांचा काळ चालला होता.

अशा प्रकारे काळ जाता जाता वर्षाकाळ संपून शरत्काळ आला. त्यातील काही दिवस लोटले. तरीही सुग्रीवाकडून रामाच्या कार्याचा स्मरणपूर्वक उल्लेखही होईलसे दिसेना. तो केवळ आपले राज्य आणि आपले सुखोपभोग ह्यातच रममाण झालेला होता. ही गोष्ट वायुपुत्र हनुमानाच्या लक्षात आली. त्याने सुग्रीवाला त्याच्या मित्रविषयक कर्तव्याची जाणीव करून दिली. सुग्रीवानेही तत्काळ हनुमानाच्या सूचनेनुसार कृती केली. त्याने आपले दूत सर्वत्र पाठवून देशोदेशीचे, सरहद्दीवरचे, गतिमानतेने अंतर तोडणारे, सूक्ष्मदृष्टीचे, पराक्रमी आणि बुद्धिमान् असे सर्व वानर तातडीने किष्किंधेला बोलावून घेण्याविषयी

सेनापतींना आज्ञा दिली. आता सुग्रीवाला आपले कर्तव्य जाणवले आहे असे समजून हनुमानादी मंत्री त्यावर न बोलता स्वस्थ राहिले. परंतु ही आज्ञा दिल्यावर श्रीराम, अथवा लक्ष्मण यांना भेटणे, बोलणे, योजना ठरवणे वगैरे कोणतीच गोष्ट न करता सुग्रीव पुन्हा आपल्या विलासी जीवनात रमून गेला.

इकडे शरदृतूचे दिवस जसजसे उलटून जाऊ लागले तसतसे राम-लक्ष्मण अस्वस्थ होऊ लागले. त्यांना सुग्रीवाकडून काहीच कळले नाही. त्यामुळे त्यांच्या अस्वस्थतेत क्रोधाने प्रवेश केला. आपण ज्याला मित्रकार्य म्हणून एवढी मदत केली, तो सुग्रीव मित्रकार्य विसरून आपल्या विलासात गढून गेलेला पाहताच श्रीराम रागावला. त्याने लक्ष्मणाला म्हटले, 'लक्ष्मणा, मला किष्किंधेत जाणे अशक्य आहे, तेव्हा तूच तेथे जा. सुग्रीवाला भेटून त्याला आपल्या कार्याविषयी स्मरण दे आणि त्याच्या मनाचा ठाव घे. राज्यप्राप्ती होण्यापुरतीच त्याची आपल्याशी स्वार्थी मैत्री होती असे आढळले तर त्याला स्पष्ट जाणीव दे की हे वैर त्याला फलदायी होणार नाही.'

श्रीरामाप्रमाणेच लक्ष्मणालाही सुग्रीवाचा रागच आला होता. लक्ष्मण तातडीने उठला आणि आपले धनुष्यबाण घेऊन म्हणाला, 'सुग्रीवाला सज्जन समजून आपण साहाय्य केले, आपल्यामुळेच तो आज राज्य आणि पत्नी प्राप्त करून बसला आहे. आता उपकार न स्मरता तो कृतघ्न झाला असेल तर त्या गुणहीनाला क्षमा करणे योग्य ठरणार नाही. तसे असेल तर त्याला वालीच्या भेटीलाच पाठविणे श्रेयस्कर असल्याने मी त्याचा आजच वध करतो.'

लक्ष्मणाने क्रोधाने असे भाषण केल्यावर श्रीराम त्याला म्हणाला, 'लक्ष्मणा, विवेकाने वागूनच हे कार्य साधणे योग्य आहे. कठोरपणे एकदम सुग्रीवाशी निर्वाणीचे बोलणे न करता, सौम्य शब्दात प्रथम तू

त्याला काळ फुकट न घालविण्याविषयी तेवढे सांग.' श्रीरामाच्या सूचनेप्रमाणे वागण्याचे मान्य करून लक्ष्मण किष्किंधेला गेला. तेथे तो जाताच त्याच्या आगमनाने भयभीत झालेल्या वानरगणांनी ती वार्ता सुग्रीवाच्या कानी पोहोचविली. सुग्रीव आणि त्याचे मंत्री यांना एकाएकी परिस्थितीचा गंभीरपणा लक्षात आला. मग आपसात विचार करून त्यांनी लक्ष्मणाचा राग कसा शांत करायचा यावर खल करून त्याप्रमाणे योजना ठरविली.

नंतर काही मंत्री जाऊन, लक्ष्मणाला त्यांनी सन्मानपूर्वक किष्किंधेत आणले. नंतर त्याची सुग्रीवाशी भेट घडविली. त्यावेळी लक्ष्मणाने सुग्रीवाला त्याची राज्यप्राप्तीच्या पूर्वीची अवस्था, रामाने केलेला पराक्रम, मित्रकार्य म्हणून रामाकडून झालेला वालीचा वध, सुग्रीवाला प्राप्त झालेले यश या सर्वांची त्यावेळी आठवण करून दिली. तसेच सुग्रीव मित्राचे उपकार स्मरत नसल्यामुळे कसा आणि किती अधोगतीला गेला आहे याचेही वर्णन केले. नंतर चांगला राजा कसा असतो, सज्जनपणा कशात असतो इत्यादींचा त्याला उपदेशही केला. परंतु हे भाषण करताना लक्ष्मणाच्या मनात धुमसणारा क्रोध सुग्रीवाला आणि त्याच्या वानरगणांना जाणवल्याशिवाय राहिला नाही.

लक्ष्मणाला भाषण पूर्ण होईपर्यंत कोणीच मध्ये अडवले नाही. नंतर अंगद पुढे येऊन लक्ष्मणाला म्हणाला, ' हे वीरश्रेष्ठा, रावण हा लंकेचा राजा असून त्याच्या बलाविषयी सर्व माहिती आम्ही मिळवली आहे. तसेच त्याची लंका ही अभेद्य नगरी कोठे नी कशी आहे याची माहिती मिळविण्याचाही आमचा प्रयत्न आहे. हे कार्य दुर्घट आहे आणि त्यासाठी विशिष्ट प्रकारे कार्य करणारे वानर एकत्र करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वानरांना पाचारण केले असून ते हळूहळू येथे जमत आहेत. अर्थात् दूरदूरच्या ठिकाणाहून ते येथे येत असल्याने काळ

अधिक जातो आहे हे खरे; पण हा काल गेला तरी परिणामी यश देणारा ठरणार यात शंका नाही.'

अशाप्रकारे लक्ष्मणाला शांत करणारे भाषण केल्यावर मग सुग्रीवाने स्वतः आपल्याकडून झालेल्या विलंबाविषयी क्षमायाचना करण्यासाठी श्रीरामाची समक्ष भेट घेतली. श्रीराम आणि सुग्रीव यांची भेट होताच एकमेकांविषयी त्यांना वाटणारे प्रेम पुन्हा उचंबळून आले. आपल्या मनात असलेली योजना सुग्रीवाने रामाला सांगितली. श्रीरामालाही ती पसंत पडली. यानंतर वानरसेनानी आपापल्या सैन्यासह दहा दिवसात उपस्थित होतील असे आश्वासन सुग्रीवाने श्रीरामाला दिले.

# १०

सुग्रीव यापुढे सतत श्रीरामाशी संपर्क साधून होता. जेव्हा जेव्हा ठिकठिकाणचे वानरवीर, वानरसेनानी आपापल्या अनुयायांसह येत होते तेव्हा तेव्हा सुग्रीव श्रीरामाला त्यांच्याविषयी माहिती देत होता. सुग्रीवाकडून वेळोवेळी समजणाऱ्या माहितीवरून श्रीराम आणि लक्ष्मण यांचे धैर्य वाढत होते. त्यांना या वानरसेनेच्या बळाविषयी अधिकाधिक विश्वास वाटू लागला होता.

त्या जमणाऱ्या वानरवीरांविषयी सुग्रीव म्हणाला, 'श्रीरामचंद्रा, हे इंद्रतुल्य पराक्रमी वानर वाटेल तिकडे गमन करणारे, पराक्रमी आणि बलवान् आहेत. समुद्रावरच्या बेटात, पर्वतावर, वृक्षांवर राहण्याचा सराव असलेले विविध ठिकाणचे हे वानर आहेत. वेगवान् आणि इच्छे-प्रमाणे रूप बदलणारे असेही काही वानर यात आहेत. असे हे विविध सामर्थ्याने परिपूर्ण वानर आता तुझ्या आज्ञेची वाट पाहात आहेत.' त्यावर श्रीराम म्हणाला, 'सुग्रीवा, या वानरदळाला आज्ञा वा मार्गदर्शन करण्यास केवळ तूच समर्थ आहेस. तेव्हा प्रथम सीता जिवंत आहे की नाही, रावण कोणत्या प्रदेशात, कसा राहतो या गोष्टींचा शोध घ्यायला पाहिजे. त्या शोधानंतर प्रत्यक्ष रावणाच्या वा सीतेच्या निवासाजवळ आपण गेलो म्हणजे पुढील कार्याविषयी त्या त्या वेळी योग्य ते मी तुझ्या मदतीने करीन.'

श्रीरामाची सूचना ऐकल्यावर सुग्रीवाने एक-एका वानरश्रेष्ठाला

त्याच्या वानरसेनेसह निरनिराळी कामे वाटून दिली. हजारोंच्या संख्येने एकत्र आलेल्या त्या वानरवीरांच्या समुदायांना पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण दिशांना पाठविले. विशेषतः दक्षिण दिशेकडे पाठविले गेलेले वानरवीर अत्यंत निवडक होते. त्या वीरांचे नेतृत्व युवराज अंगदाकडे सोपविण्यात आले होते. हनुमान, जांबवान, सुषेण, द्विविद, गवय, इत्यादींचा समावेश याच टोळीत होता. दक्षिण दिशेच्या शोधाला अधिक प्राधान्य आणि महत्त्व आहे हे ओळखूनच ही योजना करण्यात आली होती. सुग्रीवाने आपला जो मुख्य उद्देश होता तो केवळ हनुमानालाच बोलून दाखविला.

'हे वानरश्रेष्ठा, पृथ्वी, अंतरिक्ष, उदक अशा कोठेही तुझी गती कुंठित होत नाही. मानव, देवता, गंधर्व, राक्षस, नाग असे सर्व तुला ज्ञात आहेत. तू वायुपुत्र आहेस आणि त्यामुळे तुझ्या गतीला वेग, तेज आणि सामर्थ्य आहे. तेजात तर तुझी बरोबरी करणारा अन्य कोणीच नाही. तसेच बुद्धिसामर्थ्य, पराक्रम, नीतिकुशलता आणि युक्ती याही गुणांत तू श्रेष्ठ आहेस. तेव्हा तू केवळ सीतेच्या प्राप्तीचाच विचार कर.' असे सुग्रीवाने हनुमानाला उद्देशून म्हटले.

श्रीरामालाही हनुमानाविषयी असाच विश्वास वाटला. ज्याच्यावर त्याच्या स्वामीचाच एवढा विश्वास तो हनुमान केवढा आत्मविश्वास बाळगून असेल ! ज्याच्याकडून कार्यसिद्धी होईल असा सुग्रीवाला विश्वास वाटत आहे त्या हनुमानाकडून निश्चयाने सीतेच्या शोधाचे कार्य होणार असे वाटल्याने श्रीरामाने हनुमानाला जवळ बोलावून त्याच्याकडे आपल्या नावाने सुशोभित झालेली एक अंगठी दिली आणि ती खूण म्हणून सीतेला दाखविण्यास सांगितले.

यानंतर सुग्रीवाने आज्ञा केल्याप्रमाणे ते वानरवीर आपापल्या नेमून दिलेल्या दिशेकडे निघून गेले. त्या प्रत्येकाच्या ठायी असलेला आत्म-

विश्वास पाहून आणि सुग्रीवाची योजकता पाहून श्रीराम-लक्ष्मणही संतुष्ट झाले. त्यांनी आपल्या भावना बोलूनही दाखविल्या.

इकडे दक्षिणदिशेला गेलेले वानरवीर अत्यंत जागरूकतेने सर्व वने, भूप्रदेश, पर्वत, अरण्ये, गुहा वगैरेंचे अवलोकन करत पुढे पुढे जात होते. त्यांनी आपल्या परीने अत्यंत बारकाईने सर्वत्र सीतेचा शोध केला. पण यश मात्र आले नाही. मध्यंतरी काहीशा निराश अंतःकरणाने ते पुढे काय करावे या चिंतेने व्यथित झाले. आता सुग्रीवाला आणि श्रीरामाला आपली अपयशी तोंडे कशी दाखवावी असा प्रश्न स्वतःलाच विचारून ते महाबलाढ्य वीर अगदी अक्षरशः रडू लागले. मधेच कोणी त्यांच्या त्या स्थितीमध्ये धीर देणारे भाषण करत असे. मग ते पुन्हा शोधाचे काम करू लागत. असा प्रकार होता होता दक्षिणेकडे दूर-पर्यंत ते जाऊन पोहोचले. तेथे एका पर्वतशिखरावर सर्वजण विचारमग्न होऊन बसले.

आपल्याला नेमून दिलेले कार्य पूर्ण करता आलेले नाही याचा सर्वात अधिक खेद अंगदाला झाला. तो मानी राजपुत्र अपयश घेऊन पुन्हा किष्किंधेला जाऊन सुग्रीवासमोर आणि श्रीरामासमोर उभा राहायला तयार नव्हता. त्याने त्या पर्वतावर बसून प्रायोपवेशन करण्याचे ठरविले. म्हणजे तो आता काहीही न खाता न पिता कालवशात मरण येईल ते स्वीकारणार होता. त्याचा हा निश्चय पाहून इतरही वानरवीर त्याच्या-प्रमाणेच तेथे बसले. आता त्यांना अन्य कोणताच उद्योग नसल्यामुळे त्यांची आपापसात बोलणी सुरू झाली. वाली-सुग्रीव यांच्यासंबंधी, श्रीराम-लक्ष्मण यांच्यासंबंधी, रामाचा वनवास, राक्षसांचा वध, पंचवटी, शूर्पणखा, जटायू, रावण, सीतेचे अपहरण इत्यादी विषय त्यांच्या बोलण्यात येत होते.

त्यावेळी त्याच पर्वताच्या गुहेत संपाती नावाचा एक गृध्रपक्षी होता. त्याच्या कानावर ही वानरांची बोलणी गेली. तेव्हा त्यातील जटायू, रावण, सीता यांचे उल्लेख ऐकून त्याने या वानरांशी बोलायचे ठरविले. कारण, हा संपाती म्हणजे गृध्रराज जटायूचा बंधू होता. त्याने पुन्हा एकदा वानरांना जेवढी माहिती होती तेवढी विचारून घेतली. मग आपलीही ओळख सांगितली. तसेच आपण रावणाला पूर्णतया ओळखतो असेही तो म्हणाला. मग वानरांना पुन्हा उत्साह आला. त्यांनी संपातीशी अधिक संभाषण करायचे ठरविले.

'तू जर जटायूचा बंधू आहेस आणि तुझ्या भावाच्या वधाचा सूड घेण्याची तुझी जर इच्छा आहे, तर हे पक्षीश्रेष्ठा तू आम्हाला राक्षसराज रावणाविषयी आणि सीतेला त्याने कोठे नेले आहे ही माहिती सांग.' वानरांनी संपातीला म्हटले. त्यावर संपाती म्हणाला,

'वीरहो, एक तर श्रीराम आणि लक्ष्मण यांच्या बाणांचे सामर्थ्य अजोड आहे. तसेच वानरराज सुग्रीव आणि त्याचे सहकारी असणारे तुम्ही वानरवीर बुद्धीने आणि पराक्रमाने श्रेष्ठ आहात. तेव्हा आता मी सांगतो तो वृत्तान्त नीट लक्षपूर्वक ऐका.' यानंतर संपातीने रावण, सीता, लंका आणि सागर याविषयी सविस्तर वृत्तान्त निवेदन केला. मग संपातीने वानरवीरांना सीतेच्या शोधाचा प्रयत्न कसा आणि कोठे करावा याविषयीचे आपले विचार सांगून त्यांना निरोप दिला.

वानरवीर दक्षिण समुद्राच्या उत्तर तीरावर आले. प्रथम तो दीर्घ आणि पर्वतप्राय लाटांनी भरलेला समुद्र पाहून तो कसा ओलांडावा या विचाराने ते वीर खिन्न झाले. पण अखेर हनुमानानें अंतराळातून जाण्याचे आपले सामर्थ्य वापरायचे ठरवून त्याप्रमाणे उद्योग सुरू केला. प्रथम त्याने एका उंच अशा पर्वत शिखरावर जाऊन समुद्राकडे पाहिले. मग हळूहळू विशाल रूप धारण केले आणि नंतर एक प्रचंड झेप

घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या हनुमानाने क्षणात अंतरिक्ष गाठले. पाहता पाहता हनुमान दिसेनासा झाला.

हनुमान आता सागर उल्लंघन करून लंका ज्या बेटासारख्या भूप्रदेशावर वसली होती त्या त्रिकूट पर्वताच्या एका शिखरावर पोचला. हनुमान त्रिकूटाचलावर येऊन प्रथम काही काळ आपल्या पुढील कार्याची दिशा निश्चित करत विश्रांती घेत राहिला. त्याचा विचार निश्चित झाला तेव्हा तो तडक लंकेच्या दिशेने पुढे निघाला. त्याने लंकेचे निरीक्षण केले. अनेक राक्षस, खंदक, गगनचुंबी तट, दारे अशा संरक्षणाच्या सर्व साधनांनी परिपूर्ण असलेल्या त्या लंकेत हनुमानाला प्रवेश करायचा होता. हनुमानाने आता आपल्या शरीरसामर्थ्यापेक्षा कुशाग्र बुद्धीचा उपयोग करायचे ठरवले.

त्यानंतर इच्छेप्रमाणे रूप घेण्याची शक्ती, अतुल पराक्रम, अत्यंत प्रखर असे बुद्धिसामर्थ्य, प्रसंगावधान आणि चातुर्य या सर्वांचा वापर करून हनुमानाने लंकेत खूपच कार्य केले. अखेर सीतेचा शोध घेऊन, तिच्याशी संभाषण करून, श्रीराम-लक्ष्मणांचे कुशल सांगून आणि त्वरित तिची मुक्तता होईल असे आश्वासन देऊन, हनुमान मोठ्या उत्साही मनानं लंकेतून परत येण्यासाठी निघाला. प्रत्यक्षात परतण्यापूर्वी त्याने राक्षस-राज रावणाची भेट घेऊन त्याला काही सद्विचार ऐकवला, पण परिणामी त्याला वैरभावाचीच भेट राक्षसांकडून मिळाली. तेव्हा तो हनुमान आपल्या मूळ ठिकाणाकडे पुन्हा समुद्र ओलांडून आला.

हनुमानाचे सहकारी वानरवीर समुद्राच्या तीरावर त्याची वाट पाहात थांबले होते. एकाएकी त्यांना मेघगर्जनेसारखी गर्जना ऐकू आली. त्याबरोबर त्यांना खूप आनंद झाला. आपल्याला लवकरात लवकर हनुमान दिसावा म्हणून आकाशाकडे पाहत ते वानरवीर उंच उंच वृक्षांवर आणि उत्तुंग पर्वतशिखरांवर चढून चौफेर न्याहाळू लागले. थोड्यात

वेळात त्यांना आकाशमार्गाने येणारा हनुमान दिसला. तेव्हा आनंद व्यक्त करण्यासाठी ते वानरवीर मोठमोठ्याने आरोळ्या देत आणि उंच उंच उड्या मारत हनुमान कोठे उतरेल त्याचा अंदाज घेत, त्या दिशेने धावले.

हनुमान एका पर्वताच्या पृष्ठावर धाडकन येऊन उतरला. सर्व वानरवीरांनी त्याच्या भोवती कोंडाळे केले. हनुमानाने राजपुत्र अंगद, वृद्ध आणि पूज्य जांबवान ह्यांना वंदन केले. आपल्या इतर सहकारी वानरवीरांना त्याने प्रेमपूर्वक आलिंगन दिले. नंतर हनुमानाने आपल्या उड्डाणानंतरचा सर्व वृत्तान्त सांगून ‘ सीतादेवी दृष्टीस पडली ’ असे म्हटले. त्याबरोबर सर्वांनी निरनिराळ्या प्रकारे आनंद व्यक्त केला. अंगदाने अत्यंत गौरवपूर्ण शब्दात त्या वीरश्रेष्ठ वायुपुत्राची खूप स्तुती केली. तसेच वानरवीरांना शोधकार्यात यश मिळवून दिल्याबद्दल त्यांचे आभारही मानले. मग सर्वांनी काही काळ विश्रांती घेतली आणि त्याचवेळी पुढील कार्याची दिशाही निश्चित केली. यावेळी आपणच सीतेला मुक्त करावी का श्रीराम आणि सुग्रीव ह्यांना सर्व वृत्तांत कथन करून त्यांच्यासह लंकेवर चाल करून जावे यावर विचारविनियय झाला. अखेर आपण वानरराज सुग्रीवाकडून वा श्रीरामाकडून आज्ञा झाल्याखेरीज पुढे काही करू नये असे ठरवून ते सर्व वानरवीर सीतादर्शन आणि लंकादहन करून आलेल्या हनुमानासह वानरराज सुग्रीव जेथे श्रीरामासह थांबला होता त्या ठिकाणाकडे निघाले.

♣ ♣

# ११

अंगद इत्यादी वानरवीर दक्षिणेला जाऊन खूप दिवस झाले होते आणि ते परत आले नाहीत याचा अर्थ त्यांना सीतेचा शोध लागलेला नाही असा विचार करत प्रस्रवण पर्वतावर थांबलेले श्रीराम आणि सुग्रीव काहीसे दुःखी झाले होते. परंतु हनुमानाच्या कार्यकुशलतेवर वानरराज सुग्रीवाचा नितांत विश्वास असल्यामुळे तो श्रीरामाला धीर देत होता. परंतु जसजसा काळ लोटत गेला तसतसा त्याचाही विश्वास डळमळू लागला. शोध लागला नसेल तर अपयश सांगायला ते मानी वानरवीर परतही येणार नाहीत अशी शंका त्याला येत होती.

परंतु, एकाएकी त्यांच्या आशा वाढल्या. अंगदादी वानरवीर सुग्रीवाकडे येत असताना वाटेत सुग्रीवाच्याच सुरक्षित अशा मधुवनात दाखल झाले. तेथे त्यांना फळांचा आणि मधुपानाचा आस्वाद घेण्याची इच्छा झाली. अंगदाच्या अनुज्ञेने ते वीर तेथील मधुरस आणि फळे यांचा आस्वाद घेऊ लागताच दधिमुख नावाच्या वानररक्षकाने त्यांना प्रतिबंध केला. परंतु कार्यसिद्धीने संतुष्ट झालेल्या आणि श्रमाने तृषार्त झालेल्या वानरवीरांनी दधिमुखाशी झगडा करून त्याला पळवून लावले. दधिमुख त्या अंगदादी वानरवीरांविषयी तक्रार करत वानरराज सुग्रीवाकडे आला. त्याने सर्व वृत्तान्त सांगताच सुग्रीव न रागावता उलट आनंदित झाला. त्याने ओळखले की, अंगद, हनुमान हे ज्याअर्थी आपल्या सुरक्षित मधुवनात एवढ्या धिटाईने शिरले आहेत त्याअर्थी

त्यांना कार्यसिद्धीचा अनावर आनंद झाला असावा. मग सुग्रीवाने दधिमुखाला परत पाठवून त्याच्याबरोबर वानरवीरांना निरोप पाठविला की, 'त्यांनी त्वरित मला येऊन भेटावे!'

वानरराज सुग्रीव आता आनंद आणि अभिमान व्यक्त करत श्रीरामाला धीर देऊ लागला. 'सीतेचा शोध निश्चित लागला असावा आणि बहुशः हनुमानाने तो लावला असावा!' आपल्या योजनेला वानरवीरांनी यश मिळवून दिले याचा आनंद मानत तो वानरराज सुग्रीव उत्कंठेने वानरवीरांची वाट पाहू लागला. काही वेळातच अंगदाच्या नेतृत्वाखालील वानरवीर त्याला दिसू लागले. सर्व वीरांच्या अग्रभागी हनुमानाला पाहून तर सुग्रीव फारच संतुष्ट झाला. ते वानरवीर मोठमोठ्याने आवाज करत आणि आपली पुच्छें हालवीत वेगाने तेथे दाखल झाले.

श्रीराम आणि सुग्रीव ह्यांना वंदन करून हनुमानाने, 'सीतादेवी शुद्ध, पवित्र असून, मी साक्षात् त्या देवीला दृष्टीने पाहून आणि तिच्याशी भाषण करून आलो आहे' असे सांगितले. त्याबरोबर श्रीराम, लक्ष्मण आणि सुग्रीव ह्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी हनुमानाला सर्व वृत्तान्त सविस्तर निवेदन करण्यास सांगितले. त्यानंतर हनुमानाने श्रीरामाला आपल्या समुद्र उड्डाणापासून तो लंकादहना-पर्यंतचा वृत्तान्त सविस्तर निवेदन केला. शिवाय सीतादेवीने श्रीरामाला खूण पटविण्यासाठी सांगितलेले काही पूर्वायुष्यातील प्रसंग सांगून हनुमानाने श्रीरामाची खात्री पटविली. अखेरीस सीतेने दिलेला एक मणी जेव्हा वायुपुत्र हनुमानाने श्रीरामाला दिला तेव्हा त्याची पूर्ण खात्री पटली आणि तो मणी छातीशी कवटाळून श्रीराम शोक करू लागला.

श्रीराम लक्ष्मणाला आणि सुग्रीवाला सीतेच्या स्थितीबद्दलचे आपले विचार सांगून कितीतरी वेळ शोक करत होता. तसेच त्याने हनुमानाला

वारंवार सीतेचा निरोप पुनःपुन्हा सांगायला लावला. ह्याप्रमाणे काही काळ गेल्यावर राम काही प्रमाणात सावरला. मग त्याने सुग्रीवाबरोबर पुढील कार्याविषयी बोलणे सुरू केले. परंतु त्यापूर्वी श्रीरामाने हनुमानाच्या कार्याविषयी फार मोठी गौरवाची आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. या स्तुतीमुळे हनुमानाला तर आनंद झालाच पण आपली हनुमानाविषयीची अपेक्षा खरी ठरल्यामुळे सुग्रीवही संतुष्ट झाला. त्यानंतर वानरराज सुग्रीवाने श्रीरामाला धीर देणारे भाषण केले.

'हे वीरश्रेष्ठा, रघुनंदना! तुझे अमोघ बाण, तुझी शस्त्रास्त्रविषयक निपुणता आणि मी, तसेच माझे हे शूर वानरसेनापती यांची जोड असताना तू काळजी करण्याचे काहीच कारण उरत नाही. तू मात्र उत्साह दाखव. अरे, सागर अनुल्लंघनीय नाही. माझे वानरवीर सागरावरही सेतू बांधतील, पण त्यासाठी तुझे मार्गदर्शन मात्र पाहिजे. एखादा उपाय असा शोध की समुद्र तरून माझे वीर लंकेपाशी जातील; म्हणजे मग रावणवध आणि सीतामुक्ती दूर नाही हे तू निश्चित समज. सत्पक्षाचा विजय होणारच अशी माझी धारणा आहे.'

सुग्रीवाचे भाषण ऐकून श्रीरामाचे धैर्य वाढले. मग त्याने शोक करणे बंद केले, हनुमानाकडून लंकेतील सुरक्षा-व्यवस्थेची यथास्थित माहिती करून घेतली आणि तो काही निश्चिय मनाशी करून सुग्रीवाला म्हणाला, 'हे सुग्रीवा, आपण आताच दक्षिणेकडे प्रयाण करू या. सूर्य मध्यान्ही आला असल्याने हा विजय-मुहूर्त आहे. माझे बाहूही स्फुरण पावून मला शुभशकुन सूचित करत आहेत. तेव्हा हाच निश्चय योग्य आहे!'

श्रीरामाचे भाषण ऐकताच लक्ष्मण आणि सुग्रीव ह्यांनी त्याप्रमाणे सेना सिद्ध करण्याला आरंभ केला. लक्षावधी वानरवीर आणि त्याचे सेनापती ह्यांना मार्गक्रमणाची व्यवस्था समजावून सांगून सुग्रीवाने

आपले काम चोख बजावले. पर्वतप्राय शरीरे, उड्डाणातील कुशलता, गतिमानता, पराक्रम आणि धैर्य ह्यांनी युक्त असे वानरवीर नील, कुमुद, ऋषभ ह्यांच्या अधिपत्याखाली दक्षिण दिशेने मार्गक्रमण करीत अग्रभागी चालले होते. मध्यभागी श्रीराम, लक्ष्मण आणि सुग्रीव हे अनेक वानरवीरांनी परिवेष्टित होऊन चालले होते. ह्याखेरीज शतबली, केसरी, पनस, गज, अर्क हे वानरदल प्रमुख आपापल्या सेनेसह डाव्या-उजव्या बाजूंचे रक्षण करत चालले होते. तसेच सुषेण, जांबवान पृष्ठभागाचे रक्षण करत होते. श्रीरामाला हनुमान आणि लक्ष्मणाला अंगद वाहून नेत होते. अशा प्रकारची दक्षता घेऊन सुग्रीवाने आपले वानरसैन्य झपाट्याने दक्षिण दिशेकडे नेले.

सुग्रीवाच्या अधिपत्याखालील तो वानरसेना-समुद्र खळखळत त्वरेने पुढे पुढे जात होता. काही वानर पळत, काही उड्या मारत, काही उड्डाण करत असे मोठ्या वेगाने दक्षिण दिशेकडे जात होते. त्यांनी सह्यपर्वत आणि मलय नावाचा महापर्वत ओलांडला. मग ते सत्वर समुद्र-तीरावर आले. तेथे श्रीरामाच्या आज्ञेप्रमाणे त्या वानर सैन्याने तळ दिला. नंतर श्रीराम, लक्ष्मण आणि सुग्रीव पुढील योजनेवर विचारविनिमय करू लागले. आता समुद्राचे उल्लंघन कसे करावे हाच प्रधान विचार किंवा प्रश्न त्यांच्यापुढे होता. कोणती योजना करावी की ज्यामुळे हा समुद्र सहजपणे आणि सर्वांसह तरून जाता येईल ? असा श्रीरामाला पडलेला प्रश्न सोडविताना वारंवार त्याच्या मनासमोर लंका आणि पर्यायाने सीता येई. श्रीरामाला सीतेच्या केवळ आठवणीनेही भरून येत होते.

♣ ♣

१२

म. सां. सं. ठाणे, ... शाखा
बाल ...
क्र. क्र. 2008 दिनांक २०।९।
विषय प्रा.पा. क्र.

दक्षिण समुद्राच्या उत्तर तीरावर वानरसैन्याची स्थिरस्थावर होत असताना तिकडे लंकानगरीमध्ये मात्र प्रचंड खळबळ माजली होती. लंकाधीश रावणापुढे वायुपुत्र हनुमानासारख्या एकाच वानरवीराने फार मोठा पराक्रम दाखविला होता. आता तर असंख्य नामवंत वानरवीर वानरराज सुग्रीवाच्या नेतृत्वाखाली लंकेवर चालून आले होते. शिवाय दशरथपुत्र श्रीराम आणि लक्ष्मण हेही त्यांना मिळाले होते. या अयोध्येच्या राजपुत्रांचा पराक्रम मारीच, खर, दूषण, इत्यादी राक्षस-वीरांकडून ऐकायला मिळाला होता, या सर्वांमुळे राक्षसराज रावण अस्वस्थ झाला होता. त्याने एक खास सभा बोलावून आपल्या सर्व राक्षसवीरांपुढे हा प्रश्न मांडला. त्यावेळी अनेक राक्षसवीरांनी रावण-राजाला स्तुती, पूर्वायुष्यातला त्याचा पराक्रम, राम म्हणजे एक सामान्य मानव, त्याचे सैन्य म्हणजे क्षुद्र वानरे, अशा शब्दांनी आणि राक्षसांच्या अतुल पराक्रमाच्या वल्गनांनी भरीला घातला. परंतु रावणाचाच धाकटा भाऊ बिभीषण याने त्यावेळी रावणाला चांगल्या शब्दात सांगितले की सीतेचे अन्यायपूर्ण हरण करण्याचे त्याचे कृत्य निंद्य आहे.

राक्षसीवृत्तीच्या रावणाला बिभीषणाचे शब्द झोंबले. त्याने बिभीषणाला दूषणे देऊन लंकेतून हाकलून दिले. बिभीषण आपल्या काही सहकाऱ्यां-सह लंकेतून निघून श्रीरामाकडे आला. त्यावेळी प्रत्यक्ष राज्य चाल-विणाऱ्या वानरराज सुग्रीवाने त्या राक्षसांच्या बोलण्यावर विश्वास ठेवावा

की नाही याविषयी राम-लक्ष्मणांना फार चांगल्या प्रकारे विचार ऐकवले. त्याची सावधानता, राजनीति-निपुणता आणि निवेदन-पद्धती पाहून श्रीरामाला सुग्रीवाची योग्यता कळून आली. श्रीरामाने मुक्तपणे सुग्रीवाची स्तुती केली. नंतर हनुमान, अंगद, शरभ इत्यादिकांचे विचारही श्रीरामाने ऐकले. मगच आपला विचार निश्चित केला आणि जरी रावणाचा बंधू असला किंवा राक्षसकुळातला असला तरी बिभीषणाचा स्वीकार करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. या घटनेमुळे श्रीरामाचा पक्ष अधिक बलवान झाला. यानंतर 'राक्षसांचा राजा' म्हणून बिभीषणाला श्रीरामाच्या आज्ञेने राज्याभिषेक करण्यात आला. पुढे वानरराज सुग्रीवाने, बिभीषणाशी मित्रत्वाचे संबंध निर्माण झाल्यावर, मोठ्या कौशल्याने त्याच्याकडून समुद्र तरून जाण्याविषयी काय उपाय योजावा हे विचारून घेऊन रामाला ती योजना विशद करून सांगितली.

तिकडे रावणही स्वस्थ बसला नव्हता. त्याने राक्षसहेर पाठवून श्रीरामाच्या सैन्याची माहिती काढून घेण्याचा उद्योग चालूच ठेवला होता. पुढे श्रीराम आणि सुग्रीव ह्यांच्यात भेद पाडण्याचा प्रयत्न करण्यासाठी रावणाने शुक नामक एका राक्षसदूताची योजना केली. शुकाने आपल्याकडून फार कौशल्याने ही कामगिरी पार पाडण्याचा प्रयत्न केला. पण सत्त्वशील आणि दिला शब्द पाळणारा सुग्रीव विचलित झाला नाही. त्याने उलट शुकाबरोबर रावणाला अत्यंत स्पष्ट शब्दांत निरोप पाठविला. अशा रीतीने रावणाचे प्रयत्न असफल करत सुग्रीवाने आपले कार्य उत्कृष्टपणे पार पाडले. आता लवकरात लवकर समुद्र पार करून लंकेवर चालून जायचे एवढाच विचार सर्वजण करू लागले.

श्रीरामाने आपल्या अलौकिक सामर्थ्याने प्रत्यक्ष समुद्रदेवतेलाच नमवले. त्यावेळी साक्षात् महासागरानेच श्रीरामाला नलनामक वानराकडून सेतू बांधून घे, कारण, हवी ती वस्तू निर्माण करता येईल असा नलाला

त्याचा पिता जो विश्वकर्मा त्यानेच वर दिला असल्याचे सांगितले. मग श्रीरामाच्या आज्ञेवरून नलवानराने समुद्रावर सेतू बांधायला आरंभ केला. प्रचंड वृक्ष, मोठमोठे पर्वत, लांबच्या लांब दंड वानरवीरांनी भराभर आणून टाकले. कोणतीही अडचण न येता सागरावर सेतू बांधला गेला. श्रीराम, लक्ष्मण, बिभीषणादी राक्षस आणि सुग्रीवासह त्याची वानरसेना समुद्र पार करून पलीकडच्या तीरावर जाऊन पोहोचले. लंका त्यांच्या दृष्टिपथात आली. श्रीरामाचा उत्साह वाढला. सुग्रीवाला अत्यानंद झाला. आपला पराक्रम दाखविण्याची संधी आली की वीरपुरुषाला आनंद होणारच.

श्रीरामाने काही वेळ विचार करून नंतर आपल्या सैन्याची रचना पुरुषनामक महाव्यूहामध्ये केली. सुग्रीवाकडून त्याच्या वानरवीरांची योग्य ती माहिती घेऊन त्या वीरांना विशिष्ट जागा आणि कार्य नेमून दिले. सुग्रीवाच्या कार्यकुशलतेवर श्रीरामाचा पूर्ण भरवसा असल्यामुळे त्यालाच श्रीरामाने सेनानायक नियुक्त केले. लंकेच्या आसमंतात एकत्र गोळा झालेल्या वानरवीरांच्या विविध चेष्टा चालू होत्या. राक्षस लंकेच्या तटां-वरून त्या पाहात होते. वानरवीरांच्या गर्जना लंकेपर्यंत पोहोचत होत्या. त्या हलकल्लोळाने रावणसुद्धा हैराण झाला होता. त्याने आपल्या राक्षस-सेनानींना लंकेच्या रक्षणाची सर्व व्यवस्था व्यवस्थित करण्यास सांगितले. आपले काही हुषार दूत वानरसैन्यात पाठवून तेथील सर्व व्यवस्थेची माहिती मिळवली. अनेक प्रमुख राक्षसांशी रावणाने विचारविनिमय केला. काही राक्षसांनी रावणाला हा संघर्ष समाप्त करण्यासाठी सीतेला रामाच्या स्वाधीन करण्याची सूचना केली. काहींनी युद्धाला आरंभ करण्याचा विचार रावणाला सुचविला. दुष्ट प्रवृत्तीच्या आणि गर्विष्ठ रावणाला श्रीरामाशी युद्ध करणेच अधिक मानवले. देव-गंधर्वांचा पराभव करणाऱ्या रावणाला श्रीरामासारख्या मानवापुढे शरणागती पत्करणे अपमानास्पद

वाटले. त्याने युद्धाच्या दृष्टीने तयारीला आरंभ केला.

राक्षसराज रावणाने आपल्या मंत्र्यांसमवेत काळजीपूर्वक विचारविनिमय करून प्रथम लंकेच्या संरक्षणाची आणि पुढे युद्ध करण्याच्या दृष्टीने योजना तयार केली. पूर्व दरवाजावर प्रहस्ताची नेमणूक केली, दक्षिण दरवाजावर महापार्श्व आणि महोदर यांना नेमले, तर पश्चिम दरवाजावर रावणाने आपला महापराक्रमी पुत्र इंद्रजित याची नियुक्ती केली, तसेच मधल्या बुरुजावर विरुपाक्ष हा राक्षसवीर ठेवून, उत्तर दरवाजावर शुकसारण आणि स्वतः रावण यांनी राहावे असे ठरले.

इकडे श्रीरामानेही बिभीषणाच्या हेरांनी आणलेल्या वार्तेनुसार रावणाच्या व्यवस्थेचा अंदाज घेऊन आपलीही योजना निश्चित केली. नील वानराने पूर्व दरवाजा गाठून, अंगदाने दक्षिण दरवाजा गाठून, हनुमानाने पश्चिम दरवाजा गाठून तेथील राक्षसवीरांशी युद्ध करावे, आणि लंकेत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करावा असे सांगण्यात आले. तसेच रावण स्वतः ज्या उत्तर दरवाजावर आहे त्या दारावर स्वतः श्रीराम लक्ष्मणासह चढाई करणार होता. वानराधिपती बलाढ्य सुग्रीव, ऋक्षराजा समर्थ जांबवान आणि राक्षसश्रेष्ठ बिभीषण हे सैन्याच्या मध्यावर राहतील असेही ठरले. याप्रमाणे श्रीरामाने विचारपूर्वक आपल्या सैन्याची विभागणी करून रावणाची योजना असफल करण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरवले.

♣ ♣

# १३

राक्षसराज रावणाची लंका आहे तरी कशी ? हे कुतूहल सर्वांनाच होते. श्रीराम आणि त्याचे सहकारी हेही त्याला अपवाद नव्हते; म्हणूनच बिभीषणाने त्या सर्वांना लंकेच्या आसपासच्या एखाद्या उंच ठिकाणी जाण्याची सूचना केली. नंतर सर्वानुमते सुवेल नामक पर्वतावर आरोहण करण्याचे ठरले. त्याप्रमाणे सर्व प्रमुख वानरवीर, लक्ष्मण, विभीषण यांच्या सहित श्रीराम सुवेल पर्वतावर चढून गेला. तेथून लंकानगरीच्या अंतर्भागाचे सुव्यवस्थित दर्शन होत होते. भव्य आणि मजबूत दारे असलेले प्रचंड तट आता त्या पर्वतशिखरावरून छोटे दिसू लागले. तटबंदीच्या आत असलेली वने-उपवने दृष्टीस पडून सर्वांना कौतुक वाटले. तसेच रावणाचा राजवाडा किती कलात्मक, भव्य आणि सुरक्षित होता हेही त्यावेळी दिसले. सर्वजण कुतूहल, उत्सुकता आणि आश्चर्य अशा विविध भावनांनी युक्त होऊन लंकेचे निरीक्षण करत होते.

अशावेळी सुवेल पर्वताच्या एका उंच शिखरावर श्रीरामासह असलेल्या सुग्रीवाला लंकानगरीच्या वेशीवरील एका उंच मनोऱ्यात राक्षसराज रावण बसलेला आहे असे आढळले. एकाएकी सुग्रीवाच्या मनात रागाचा आवेश आणि पराक्रमाचा उत्साह निर्माण झाला. असामान्य शक्तीने युक्त असलेल्या सुग्रीवाने तेव्हा कोणाचीही पर्वा न करता अकस्मात् आकाशात उड्डाण केले आणि तडक तो रावणासमोर जाऊन उतरला. निर्भय मनाने सुग्रीवाने रावणाची निर्भत्सना केली आणि लगेच रावणाच्या

अंगावर धावून जाऊन त्याने रावणाच्या मस्तकावरचा मुकुट खाली पाडला. आता मात्र रावण रागावला आणि त्यानें सुग्रीवाला आपल्या विशाल अशा दोन हातांनी जमिनीवर आपटले. पण सुग्रीवाने तेव्हा चेंडूसारखी उसळी मारून रावणासमोर जाऊन त्याला धडक दिली. रावण खाली पडला. यानंतर रावण आणि सुग्रीव एकमेकांना धडा शिकवण्याच्या ईर्षेने मलयुद्ध करू लागले.

एकमेकांना आवळणे, हातापायांचे प्रहार करणे, जमिनीवर लोळवणे, वर उचलून जमिनीवर आपटणे इत्यादी प्रकारांनी सुग्रीव आणि रावण हे योद्धे बराच वेळ झुंजत राहिले. युद्धाचा अभ्यास, स्वाभाविक बल आणि एकमेकांविषयी असलेला द्वेषयुक्त राग यांमुळे ते दोघेही वीर त्वेषाने एकमेकांवर प्रहार करत होते. अनेक डावपेच वापरून दुसऱ्याला पराभूत करण्याचा प्रयत्न दोघांकडूनही चालू होता. परंतु कोणालाच, कोणीच हार जात नव्हते. अखेर या प्रकारच्या युद्धाने निर्णय होणार नाही असे ओळखून राक्षसराज रावणाने आपल्या ठायी असणाऱ्या मायाबलाचा उपयोग करण्याचे ठरवून त्याप्रमाणे काही चमत्कार दाखविण्याचा प्रयत्न करण्याचा विचार केला, परंतु तेवढ्यांत सुग्रीवाने आकाशांत उड्डाण केले आणि तो वायूच्या गतीने आपल्या जागी सुवेल पर्वतावर परतला. रावण चकित होऊन त्या वानराधिपतीच्या उड्डाणाकडे पाहात राहिला पण तो काहीच करू शकत नव्हता.

त्यानंतर सुग्रीवाच्या अंगावरील रक्त, घाम, रंग यांच्याकडे पाहून श्रीरामाने त्या समर्थ वानरवीराच्या कृत्याचा अंदाज केला आणि त्याच्या पुनरागमनाविषयी आनंद व्यक्त करून श्रीराम म्हणाला, ' हे साहसप्रिय सुग्रीवा, तुझ्या अचाट पराक्रमाचे मला कौतुक वाटते हे जरी खरे असले तरी हे साहस अनुचितच म्हणावे लागेल. आम्हा सर्वांना न विचारता तू एकाएकी हे साहस केलेस आणि सुदैवाने यशस्वी झालास खरा; परंतु

राजे लोक असे कृत्य करत नाहीत. यावेळी दुर्दैवाने काही विपरीत घडले असते तर ! कार्यनाश हेच त्याचे उत्तर होते. तेव्हा पुन्हा असे विपरीत साहस करू नकोस.' श्रीरामाचे हे भाषण सुग्रीवानेही नम्रपणे मान्य केले. तो म्हणाला, 'आपल्या कार्याचा आणि माझ्यावरील जबाबदारीचा विचार केला तर माझे हे साहस निश्चितच समर्थनीय ठरणार नाही. पण प्रिय मित्राच्या पत्नीचा, पवित्र सीतेचा अपमान करणारा तो क्रूर, दुष्ट आणि गर्वाने उद्धट बनलेला रावण दृष्टीला पडताच माझा क्रोध अनावर झाला आणि त्यामुळेच मी हे साहस केले. मी यापुढे जबाबदारी ओळखून वागेन.'

अशा प्रकारे एकदा एकट्या वायुपुत्र हनुमानाने लंकेत केलेला पराक्रम आणि आता वानराधिपती सुग्रीवाने प्रत्यक्ष रावणाला दाखविलेला आपल्या युद्ध कौशल्याचा अनुभव यामुळे रावण आणि त्याचे राक्षसगण चकित झाले; काहीसे घाबरले; पण राक्षसी शक्तींच्या विश्वासाने तितकेच चिडलेही. त्या उलट श्रीरामाच्या मनात आणि वानरवीरांच्या मनांत अपार उत्साह निर्माण झाला. आपल्या पक्षात वानरराज सुग्रीव, वायुपुत्र हनुमान यांसारखे वीरश्रेष्ठ आहेत याचा अभिमान, स्वतःचा पक्ष बलवान आहे आणि तो सत्याचा पक्ष आहे असा विश्वास वानरसैन्यात निर्माण झाला. ते आता रावणाचा आणि राक्षससैन्याचा समाचार घेण्यासाठी उत्सुक बनले. श्रीरामानेही या परिस्थितीचा विचार करून लंकेवर त्वरित चाल करण्याचा निर्णय घेतला.

यानंतर विविध राक्षसवीर आणि वानरवीर यांच्यामध्ये तुमुल आणि घनघोर संग्राम चालू झाला. रावणाकडील वीरांचे वानरांच्या सैन्यावरील चढाई करणे अव्याहत चालू होते. तितक्याच कसोशीने राक्षसांचा प्रति-

कार करत अनेकदा राक्षसश्रेष्ठांना कंठस्नान घालण्याचे कार्य वानरवीरांनी चालू ठेवले होते. युद्धाच्या अशा प्रसंगात अंगद, सुषेण, हनुमान, सुग्रीव यांनी आपला पराक्रम दाखवून राक्षसपक्षाला चकित केले होते. रावणालाही वारंवार पराभवाच्या, राक्षसवीरांच्या मृत्यूच्या वार्ता ऐकाव्या लागत होत्या. त्यामुळे तो सचिंत झाला होता.

♣ ♣

# १४

वानरराज सुग्रीव आणि अन्य वानरवीरश्रेष्ठ यांनी राक्षसांबरोबर केलेल्या युद्धात अनेक प्रमुख राक्षस मारून टाकले होते. परंतु राक्षसराज रावणाने यानंतर आपला बंधू राक्षसश्रेष्ठ कुंभकर्णाला जागा करून, त्याला मोठेपणा देऊन आणि त्याच्या पराक्रमाला गौरवून जेव्हा, श्रीरामाने लंकेवर आणलेल्या संकटाची वार्ता सांगितली, तेव्हा त्याने अत्यंत चिडून लंकेतून बाहेर येऊन वानरसैन्याचा प्रचंड संहार सुरू केला. सर्वसामान्य वानरवीरांना तर त्याच्या पुढे उभे राहणेही अशक्य होऊन बसले. कुंभकर्णाने पटापट वानर धरून त्यांना खाण्याचा सपाटाच लावला. सुषेण, अंगदादी वानरवीरांना तर त्याने बेहोष करून भूमीवर पाडलेच पण विशेष म्हणजे वानरराज सुग्रीव हाही त्या प्रचंड देह असलेल्या आणि महापराक्रमी कुंभकर्णाच्या तावडीतून सुटला नाही. प्रथम सुग्रीवाने पर्वतशिखरांनी आघात करून कुंभकर्णाला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचे सर्व प्रयत्न विफल करून त्या कुंभकर्णाने त्याला आपल्या दीर्घ बाहूंनी पकडून ठेवला.

विशाल देहाचा कुंभकर्ण एवढा पराक्रम करून लंकेमध्ये परत जायला निघाला तेव्हा बेशुद्ध अवस्थेत, कुंभकर्णाच्या हातात एखाद्या क्षुद्र बाहुलीसारखा लोंबकाळत, गलितगात्र सुग्रीवही लंकेत चालला होता. ते दृश्य अति भयानक होते. कुंभकर्णाने लंकेत प्रवेश केल्यावर त्याच्या विजयाने

आनंदित झालेल्या नागरिकांनी त्याचा जयजयकार करून, त्याच्या अंगावर लाह्या आणि गंधोदक यांचा वर्षाव केला. या वर्षावातून कुंभकर्णाच्या हातातल्या सुग्रीवावरही त्या वस्तूंचा वर्षाव झाला. याचा सुग्रीवाला फायदा असा झाला की त्याची शुद्ध परत आली. त्याबरोबर सुग्रीवाने आपल्या नखांनी आणि दातांनी कुंभकर्णाचे कान, नाक रक्तबंबाळ करून, आपल्या हातापायांनी कुंभकर्णाच्या कुशीत जोराचे प्रहार केले. यामुळे चिडलेल्या कुंभकर्णाने सुग्रीवाला हातावर तोलून, त्याला जमिनीवर जोराने आपटले. तेव्हा पराक्रमी सुग्रीव जमिनीवरून उसळी घेऊन थेट आकाशात उडाला. अशाप्रकारे सुग्रीवाची मुक्तता होऊन तो श्रीरामापाशी आला. यानंतर श्रीरामाने कुंभकर्णाचा वध केला.

कुंभकर्णाच्या वधाची वार्ता रावणाला समजली तेव्हा प्रथम त्याचा विश्वासच बसेना. पण प्रत्यक्षात ती वार्ता खरी असल्याचे समजल्यावर मात्र त्याचा धीर खचला. तो अत्यंत शोक आणि अत्यंत संताप अशा संमिश्र भावनांनी पछाडला गेला. परंतु काही वेळाने रावणाचा धीर वाढेल अशा तऱ्हेची राक्षससेनानींची भाषणे ऐकून तो दुःखी आणि निराश रावण पुन्हा सावरला. त्रिशिरा, देवांतक, नरांतक असे एकापेक्षा एक पराक्रमी आणि विशाल शरीराचे राक्षसवीर भोवताली पाहून रावणाला आनंद झाला आणि त्याने पुन्हा पूर्वीच्याच पद्धतीने या राक्षसांना श्रीराम आणि वानरसैन्य यांच्या वधासाठी युद्धावर पाठविले.

कुंभकर्णाने केलेली वानरसैन्याची वाताहत लक्षात येताच, अत्यंत चीड आलेले वानरप्रमुख नव्या राक्षसवीरांवर पर्वतशिखरे आणि प्रचंड वृक्ष घेऊन चाल करून आले. तेव्हा कुंभकर्णाच्या वधाची चीड मनात बाळगणारे राक्षसवीरही अत्यंत त्वेषाने वानरसैन्यावर तुटून पडले. युद्धाची धुमश्चक्री चालू झाली. गर्जना, शस्त्रांची फेकाफेक आणि घायाळ होणाऱ्या वीरांच्या किंकाळ्या यांनी सारे वातावरण दुमदुमून गेले.

यावेळच्या युद्धात दोन्ही बाजूंकडून पराक्रमाची शर्थ केली गेली. परंतु अखेर अंगदाने नरांतकाचा, वायुपुत्र हनुमानाने देवांतकाचा, नीलाकडून महोदराचा, हनुमानाच्या हातून त्रिशिराचा, अशा क्रमाने वध करण्यात आला. या सर्वांच्या वधाने अत्यंत संतप्त झालेला राक्षसश्रेष्ठ मत्त हा वानरसैन्यावर चालून आला. परंतु ऋषभ वानरवीराने मत्त नामक त्या राक्षसवीराचाही वध केला. अशा रीतीने आपले बंधू आणि अत्यंत पराक्रमी राक्षसवीर रणात मारले गेलेले पाहून रावण मात्र चकित झाला. अशाच प्रकारे रावणाचा पुत्र अतिकाय, वगैरे राक्षसही रणांत मारले गेले.

आता, यापुढे प्रत्यक्ष राक्षसराज रावण युद्धाला येणार हे चाणाक्षपणे हेरून वानरराज सुग्रीवाने एक नवीच युक्ती योजली. त्याने आपल्या वानरवीरांना हातात दिवट्या घेऊन रात्रीच्या वेळी अचानक लंकेत प्रवेश करून ती लंका जाळायला सांगितली. लंकेमध्ये ठिकठिकाणी वानरवीरांनी आग लावली. सर्वत्र गोंधळ, हलकल्लोळ उडाला. पुन्हा एकदा रावणाच्या आज्ञेने राक्षसांनी वानरवीरांवरोबर युद्ध सुरू केले. एकमेकांकडील वीरांना घायाळ करत दोन्ही बाजूचे वीर युद्ध करू लागले.

यावेळी कुंभकर्णाचा पुत्र कुंभ हा खूप पराक्रम करून वानरांचा ग्रास करू लागला. त्याने वालीपुत्र युवराज अंगदालाही ज़ेरीस आणले. परंतु ते पाहताच स्वतः वानरराज सुग्रीव अंगदाच्या मदतीस गेला. त्याने आपल्याकडे कुंभाचे लक्ष वेधून घेऊन त्याच्याशी युद्ध करण्यास आरंभ केला. सुग्रीवाने कुंभावर वृक्षांची वृष्टीच सुरू केली. कुंभाने काही काळ धैर्य दाखवून आपल्या बाणांनी ते वृक्ष तोडून टाकले. परंतु काही वेळातच सुग्रीवाने कुंभाच्या हातातील धनुष्य तोडून टाकण्यात यश मिळविले. यानंतर कुंभ आणि सुग्रीव यांच्यात मल्लयुद्ध सुरू झाले. हाताच्या मुठी, मस्तकांच्या टकरा आणि प्रखर लाथांचे तडाखे एकमेकांना मारून ते

दोघेही आपल्या पराक्रमाची, शक्तीची आणि कौशल्याची सीमा करीत लढले. अखेर एक जबरदस्त असा मुष्टीप्रहार सुग्रीवाने कुंभाच्या छातीवर केला आणि कुंभ रणात पडला.

यानंतर एकएका राक्षसाचा पाडाव करत वानरसेना विजयाकडे वाटचाल करत असता रावणाचा महापराक्रमी पुत्र इंद्रजित युद्धाला आला. इंद्रालाही जिंकणाऱ्या त्या महाबलाढ्य वीराने वानरसैन्याची धूळ-दाण उडवली. अनेक वेळा आणि अनेक ठिकाणी त्याचा पराक्रम यशस्वी ठरला. आकाशात अदृश्य राहून युद्ध करणे, मायाजालाचा उपयोग करणे, विविध शस्त्रास्त्रे वापरणे, अलौकिक धैर्य दाखवणे अशा विविध प्रकारांचा अवलंब करून इंद्रजिताने काही काळ रामाच्या सैन्याला मोठ्याच पेचात आणले. श्रीरामालाही त्याच्या पराभवाचे मर्म नीट आकलन होईना. त्यावेळी बिभीषणाने उत्तम सल्ला दिला. लक्ष्मणाकडून त्याने इंद्रजिताचा वध करविला. ही घटना रावणाचे धैर्य घालविण्यास फारच उपयोगी ठरली. आता रावणाच्या सैन्यातील भरवशाचे जवळ-जवळ सर्व राक्षस मृत्युमुखी पडले होते.

रावणाच्या मनात या एकामागून एक येणाऱ्या वार्तांनी फार मोठा गोंधळ माजवला होता. राक्षससेनानींचा वध झाल्याचे ऐकून तो चकित झाला. कुंभकर्णासारख्या अतुल सामर्थ्यवानाचा वध झाल्याचे कळल्यावर त्याचा धीर खचला. अत्यंत भरवशाचे असे त्याचे इतर बंधू आणि स्वतःचे पराक्रमी पुत्र यांचा वध झालेला पाहून शोकाने तो व्यथित झाला. त्याचवेळी क्षुद्र मानव आणि वानर यांच्या सैन्याने आपली प्रतिष्ठा घालविल्याचे पाहून तो खूप खूप चिडला. त्याने कोणताही अन्य विचार न करता आता स्वतःच युद्ध करण्याचा निश्चय केला. उत्तम रथ, अनेक शस्त्रे, प्रचंड सेनासमुदाय ह्यांनी युक्त असलेला रावण रणांगणात आला.

महापराक्रमी रावणाने अनेक प्रकारे युद्धात विविध प्रसंगी जे कौशल्य दाखविले त्यापुढे कोणाही वानरवीराला टिकाव धरता आला नाही. मधूनमधून वायुपुत्र हनुमान, वानरराज सुग्रीव यासारख्या वानर-वीरांनी थोडाफार पराक्रम केला. परंतु राक्षसश्रेष्ठ रावणाच्या पराक्रमाला ते व्यवस्थित तोंड देऊ शकले नाहीत. अखेर श्रीरामानेच रावणाशी युद्ध करायला आरंभ केला. ही निर्णायक धुमश्चक्री होती. दोघेही साक्षात् समोरासमोर ठाकले. या दोन वीरांच्या यशापयशावरच सर्व काही अवलंबून होते. एकमेकांना दूषणे देऊन त्वेष निर्माण करत त्यांनी शस्त्रे, अस्त्रे, शक्ती, डावपेच अशा विविध साधनांनी आपला पराक्रम गाजविला. एकाने एक अस्त्र वापरले तर दुसऱ्याने विरोधी अस्त्राने त्या पहिल्या अस्त्राचा प्रभाव नाहीसा करावा. एकमेकांवर सोडलेली शस्त्रे त्यांनी आकाशमार्गातच मोडून काढावीत असा प्रकार सतत चालू होता. अखेर श्रीरामाच्या एका अमोघ, शक्तिशाली बाणाने रावणाचा वध झाला.

♣ ♣

# १५

रावणाचा वध झाला आणि श्रीरामाचा जय झाला ! ही वार्ता सर्वत्र पसरली तेव्हा अनेक प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. बिभीषणाला बंधूच्या मृत्यूचे दुःख झाले आणि त्याच वेळी अन्यायी जीवनाचा असाच शेवट होणार या जाणिवेने त्याला सांत्वनही मिळाले. लंकेतील राक्षसगणांच्या मनात भीतीने थैमान मांडले तर रावणाच्या स्त्रियांना शोकावेग आवरणे कठीण झाले. देव, गंधर्व, ऋषी यांना मोठा आनंद झाला. वानरवीरांना आपल्या पक्षाच्या विजयाचा आनंद तर झालाच पण ते सर्व श्रीरामाच्या अतुल पराक्रमाने चकितही झाले. वानरराज सुग्रीव कर्तव्यपूर्तीच्या आनंदाने आणि मित्रकार्य पूर्ण केल्याच्या जाणिवेने सुखी झाला.

श्रीरामाने यानंतर वेळ न दडवता पुढील कर्तव्य ओळखून सूचना देण्यास आरंभ केला. त्याने बिभीषणाचे सांत्वन करून त्याला रावणाचा यथायोग्य रीतीने अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. लक्ष्मणाला आज्ञा करून, त्याने बिभीषणाच्या लंकेतील राज्याभिषेकाची व्यवस्था करण्यास त्याला सांगितले. नंतर श्रीरामाने वायुपुत्र हनुमानाला म्हटले, ‘ हे वीरा, तू बिभीषणाची आज्ञा घेऊन सीतेला भेट. आम्हां सर्वांचे कुशल तिला सांगून, तिचे कुशल विचार आणि परत इकडे ये. ’

यानंतर बिभीषणाने स्वतःच पुढाकार घेऊन श्रीराम आणि सीता ह्यांची भेट घडवून आणली. या प्रसंगी श्रीरामाने भावनेच्या आहारी न

जाता लोकव्यवहार लक्षात घेऊन सीतेला अग्निदिव्य करावयास लावले. सीतेच्या शुद्धतेविषयी खात्री होऊन मगच सर्वांच्या समक्ष श्रीरामाने सीतेचा स्वीकार केला. हे सर्व पूर्ण झाले आणि नंतर बिभीषणाने श्रीरामाला लंकेमध्ये काही काळ विश्रांतीसाठी पाहुणचाराला बोलावले. परंतु श्रीराम वचनबद्ध होता, शिवाय त्याचा प्रिय बंधू भरत श्रीरामा-प्रमाणेच वनवासी अवस्थेत अयोध्येजवळ थांबला असल्याने, त्याची भेट घेतल्याशिवाय श्रीराम नगरप्रवेश किंवा वस्त्रालंकार ह्यांचा स्वीकार करू शकत नव्हता. श्रीरामाने यावेळी बिभीषणाला वानरराज सुग्रीव आणि त्याचे सहकारी वानरवीर ह्यांचा मात्र सत्कार करण्यास सांगितले.

बिभीषणाने श्रीरामाची आज्ञा सत्वर पाळली. तसेच त्याने श्रीरामाला अयोध्येकडे नेण्यासाठी पुष्पक नावाचे विमानही सिद्ध केले. आता सीता, लक्ष्मण आणि श्रीराम विमानात बसून निघणार तेवढ्यात वानराधिपती सुग्रीव आणि राक्षसराज बिभीषण हात जोडून रामाला विनंती करू लागले की, ' हे प्रभो, तुझ्याबरोबर आम्ही अयोध्येला येऊ, तेथे तुला राज्याभिषेक झालेला पाहू, नंतर अयोध्येचे वैभव अवलोकन करून आणि तुझ्या आप्तांचे आशीर्वाद घेऊन मगच स्वगृही जाऊ. '

श्रीरामाने त्यांची विनंती तत्काळ मान्य केली. मग सुग्रीव आणि बिभीषण आपापल्या अनुयायांसह विमानात चढले आणि विमानाने अयोध्येच्या दिशेने उड्डाण केले. विमानाच्या ह्या प्रवासात श्रीराम वारंवार सीतेला खालील भूप्रदेशाची माहिती सांगत होता. वाटेत किष्किंधा-नगरी लागली. तेव्हा श्रीरामाने मुद्दाम विमान थांबवून सुग्रीवाला आज्ञा केली आणि सर्व वानरस्त्रियांनाही त्याने अयोध्येला नेण्यासाठी विमानात घेतले. अखेर श्रीराम आपल्या सहकाऱ्यांसह भरद्वाज मुनींच्या आश्रमात येऊन पोचला. आता त्याच्या प्रतिज्ञेची चौदा वर्षे पूर्ण झाली होती.

भरद्वाजांच्या आश्रमातून श्रीरामाने भरताला निरोप पाठवून आपले आगमन त्याला कळवले. नंतर भरत अत्यंत आनंदाने श्रीरामाच्या स्वागतासाठी लवाजम्यासह आला. श्रीरामाला भरताने मोठ्या सन्मानाने अयोध्येकडे नेले. यावेळी त्याने विभीषण आणि सुग्रीव ह्यांचाही गौरव केला. या वेळपर्यंत अयोध्येत श्रीरामाच्या आगमनाची वार्ता पोचली होती आणि रामाला राज्याभिषेक करण्याची तयारीही सुरू झाली होती.

श्रीरामाच्या सूचनेवरून भरताने राक्षसराज विभीषण आणि वानरराज सुग्रीव ह्यांची निवास, भोजन, सुखसोयी या सर्व बाबतीत उत्कृष्ट व्यवस्था केली होती. राज्याभिषेकाचा सोहळा अपूर्व थाटात उरकला. नंतर अयोध्येचा राजा श्रीराम ह्याने सर्वांचा वस्त्रालंकार देऊन सत्कार केला. मग सर्वजण आपापल्या घरी जाण्यास निघाले.

श्रीराम आणि रामसखा सुग्रीव ह्यांनी एकमेकांचा निरोप घेतला तेव्हा दोघांनाही आनंदाच्या अश्रूंनी भिजवून टाकले.

♣ ♣

BVBK-0402008

म. ग्रं. स. ठाणे, ग्रंथालय शाखा.
मराठी वाङ्मय विभाग
क्र. २००८ दिनांक २५।५।८६
विषय पोथी क्र.